बुधवार, ३० नोव्हेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१०८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 30 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-108 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# ‘काँग्रेसच्या ‘फोडा आणि राज्य करा’ नीतीचा गुजरातला फटका

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे काँग्रेसवर टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गुजरातमध्ये १ डिसेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान होणार आहे. याआधी प्रचाराची सांगता होण्याअगोदर काँग्रेस, आप तसेच भाजपाच्या सर्वच प्रमुख नेत्यांनी गुजरातमध्ये जाहीर सभा घेतल्या आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रावणाशी तुलना केली. तर भाजपाकडूनदेखील काँग्रेसच्या या टीकेला जशास तसे उत्तर देण्यात आले. नरेंद्र मोदी यांनी आपल्या सभेत काँग्रेसची विचारधारा आणि धोरणावर जोरदार टीका केली आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील सौराष्ट्रात एकूण चार सभांना संबोधित केले. या सभांमध्ये त्यांनी प्रामुख्याने काँग्रेसला लक्ष्य केले. भावनगर जिल्ह्यातील पालीताना येथे सभेला संबोधित करताना त्यांनी काँग्रेसने नेहमीच फोडाफोडीचे राजकारण केलेले आहे. भाजपा सत्तेत येण्यापूर्व काँग्रेसने गुजरातमध्ये याच नीतीचा अवलंब केलेला आहे, अशी टीका केली. एकता आणि सौहार्द हा आमचा मंत्र आहे. गुजरातमधील जनतेत एकजूट आहे. याच कारणामुळे गुजरात प्रगतीपथावर आहे. तर दुसरीकडे ‘फोडा आणि राज्य करा’ अशी काँग्रेसची रणनीती राहिलेली आहे, असे मोदी म्हणाले. काँग्रेसने लोकांमध्ये भांडण लावण्याचे काम केले. काँग्रेसने नेहमीच आपले हीत शाबूत राहावे कसे राहील याचा विचार केलेला आहे. गुजरात वेगळे राज्य होण्याअगोदर काँग्रेसने मराठी आणि गुजराती लोकामध्ये भांडण लावून दिले. याच कारणामुळे गुजरात राज्याची निर्मिती झाल्यांतर वेगवेगळ्या प्रांतात, समाजात तेढ निर्माण झाली. मात्र गुजरातच्या लोकांनी एकजुटीचा मार्ग निवडला आणि भाजपाला संधी दिली. मागील २० वर्षांपासून गुजरात प्रगतीच्या मार्गाने जात आहे. याआधी बाजार, मंदिरांमध्ये बॉम्बस्फोट व्हायचे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

## मूल निरागस हो!



आधुनिक केसरी

बहुसंख्य लहान मुले अजिबात देवाघरची फुले नसतात. निरागस तर नसतातच. खासकरून बारा वर्षांच्या पुढची मुले महाडांबरट झालेली आहेत. मुलांना आणि मुलींनाही दुसऱ्या मुलांचे बरे झालेले पाहवत नाही. इतर मुलांना शिक्षा व्हावी म्हणून त्यांच्या चुका ते मुद्दाम उघड करतात. कुणाला शिक्षा मिळाली की या मुलांना भयंकर आनंद होतो.

काही खुनशी मुलांच्या टोळ्या असतात. या टोळ्यांना एखादे मूल सुपारी देते. मग ही टोळी त्याच्या शत्रूला लक्ष्य करून त्याची 'आंधी' घेते. म्हणजे त्याचे डोके कोटाने झाकून सर्व जण त्याला बदडतात. डोके झाकल्यामुळे कुणी लाथा घातल्या ते त्याला कळत नाही. शाळेत भांडणे झाली की 'शाळेच्या बाहेर भेट, मग दाखवतो' अशी धमकी देऊन व्यवस्थित हिशोब चुकता केला जातो.

लहान मुलांना आईबापाची किंवा शिक्षकांची फार भीती वाटत नाही. त्यांना दहशत असते ती आपल्याच वर्गातल्या इतर मुलांची किंवा मोठ्या भावंडांची. मारामारीपर्यंत हे प्रकरण आता राहिलेले नाही. रक्त पाहून मुलांना आता काहीच वाटत नाही. खून किंवा आत्महत्या करणे ही फार किरकोळ गोष्ट वाटते. अल्पवयीन असल्यामुळे आपल्याला फाशी वगैरे होणार नाही हे सुद्धा त्यांना माहीत आहे.

त्यामुळेच निर्दयपणे डोक्यात डंबेल घालून औरंगाबादच्या प्राध्यापकाचा खून त्यांचाच मुलगा करतो. जालन्यातील अल्पवयीन मुलगी आपल्याच लहान चुलत बहिणीचा गळा ब्लेडने चिरते. पालक व शिक्षकांची न्यायबुद्धी जागृत नसली की मुले कायदा हाती घेऊन स्वतःच न्याय करतात, असे एक निरीक्षण आहे. एखादे मूल बदनाम झाले की त्याचा कायम द्वेष करायचा आणि दुसऱ्याचे चुकले तरी सतत लाड करायचे ही भूमिका अनेक पालक व शिक्षक घेतात. त्यातून तयार झालेली घुसमट कधी कधी खुनापर्यंत जाते.

आमच्या लहानपणी आम्ही पाहिले की, एका एकुलत्या एका मुलाचे अतिशय लाड पालकांनी केले. मागितलेली प्रत्येक वस्तू त्याला दिली. नाही दिली की त्याला प्रचंड राग येत असे. त्यामुळे नकार पचवण्याची शक्ती त्याच्यात निर्माणच झाली नाही. पुढे या मुलाने तिशीच्या आत स्वतःला जाळून घेतले. आपल्याला अशा आत्मघाती किंवा खुनी मुलांचा समाज नको आहे.प्रत्येक मूल निरागस होण्यासाठी काय करावे तुम्हीच सांगा...!

**- विनोद जैतमहाल**

# पोलीस भरतीचा अर्ज भरण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पोलीस भरतीसाठी अर्ज



करण्यासाठी 15 दिवसांची मुदत वाढवण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची माहिती दिली. मागील काही दिवसांपासून पोलीस भरतीसाठी अर्ज करण्यासाठी मुदत वाढवण्यासाठीची मागणी करण्यात येत होती. पोलीस भरतीसाठी इच्छुक असणाऱ्यांना आता 15 डिसेंबर 2022 पर्यंत अर्ज भरता येणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की,



पोलीस भरती बाबत आमच्याकडे 11 लाख 80 लाख अर्ज आले आहेत. पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून तक्रारी समोर आल्या होत्या. त्यानंतर आता पोलीस भरतीसाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्यासाठी 15 दिवसांची मुदत वाढवण्यात आली असल्याचा निर्णय झाला असल्याचे फडणवीस यांनी म्हटले. पोलीस भरतीसाठी ऑनलाइन अर्ज भरताना आलेल्या सर्व अडचणी दूर करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. जाहीर झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करायचे आहेत. मात्र, संबंधित वेबसाईट वारंवार हँग होत असल्याने इच्छुकांना अर्ज भरताना अनेक अडचणी जाणवत होत्या. राज्यातील काही ठिकाणी अर्ज भरण्यासाठी बराच तास लागत होता. अनेक विद्यार्थ्यांचे अद्याप रजिस्ट्रेशन झाले नसून काही विद्यार्थ्यांची पेमेंट प्रक्रिया देखील अडकली असल्याची तक्रार करण्यात येत होती.

# शिंदे-ठाकरे वादावर निवडणूक आयोगासमोर १२ डिसेंबरला सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात मोठी बंडखोरी झाली. या बंडखोरीनंतर शिवसेना पक्षात उघड-उघड दोन गट पडले. या बंडखोरीनंतर शिंदे गटाने आम्हीच शिवसेना पक्ष असल्याचा दावा केला आहे. तसेच शिंदे गटाने शिवसेनेच्या धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावरदेखील दावा केलेला आहे. याच वादावर येत्या १२ डिसेंबर रोजी निवडणूक आयोगापुढे पहिली सुनावणी होणार आहे. बंडखोरीनंतर शिंदे गटाने निवडणूक आयोगाला पत्र लिहित आम्हीच खरी शिवसेना असल्याचे म्हणत पक्ष आणि पक्षचिन्हावर दावा केला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे गटाने न्यायालयात धाव घेत निवडणूक आयोगाला पक्षचिन्हाबाबत कोणताही निर्णय घेण्यापासून रोखावे अशी मागणी केली होती. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली होती. त्यानंतर आता शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हावरील वादावर येत्या १२ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. याआधी आयोगाने दोन्ही गटांना पक्ष तसेच पक्षचिन्हावर दावा सांगण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे जमा करण्यासही मुदतवाढ दिली आहे. दोनी गटांना येत्या ९ डिसेंबरपर्यंत निवडणूक आयोगाकडे ही कागदपत्रे जमा करता येणार आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या ८ तारखेला निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह गोठवले होते.

# गंभीर गुन्हे असलेल्या युवकाने बळजबरीने विवाह केल्याची तरुणीची तक्रार


## आरोपींच्या तत्काळ अटकेसाठी ग्रामस्थांचा सामूहिक आत्मदहनाचा इशारा; सर्व आरोपींना अटक - स.पो.नि.राहुल वाघ

आधुनिक केसरी न्यूज

निफाड : रुई ता.निफाड येथील नाशिक येथे शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय तरुणीला, आई वडिलांना जीवे मारण्याची धमकी देत, बळजबरी विवाह केला व नांदावयास न गेल्याने गुंडांच्या टोळक्याने शस्त्रांचा धाक दाखवत विनयभंग व दहशत माजवल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात १० जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. सदर तरुणीने लासलगाव पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत, मी, आई, वडील, आजी, आजोबा असे आमचे एकत्र कुटुंब असून आमचा शेती व्यवसाय आहे. मी नाशिक येथील केटीएचएम कॉलेजमध्ये टी.वाय.बी.बी.ए मध्ये शिक्षण घेत असून कॅनडा कॉर्नर येथे भाड्याने रूम घेऊन राहते. सहा महिन्यापूर्वी संदीप काशिनाथ नागरे रा.डोंगरगाव याच्याशी माझी ओळख व नंतर मैत्री झाली. त्यानंतर दि.१० नोव्हेंबर २०२२ रोजी त्याने मला लग्न करण्यासाठी दबाव टाकून आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी देत बळजबरीने माझ्याशी साई वैदिक केंद्र, अशोक स्तंभ, नाशिक येथे वैदिक पद्धतीने विवाह करून घेतला. विवाहाविषयी कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या आई-वडिलांना मारून टाकेल अशी धमकी दिली. दि.२२ रोजी माझा भाऊ मला गावी घेऊन असता मी सदर प्रकार कुटूंबियांना सांगितला. दि. २४ नोव्हेंबर रोजी संदीप नागरे यांनी मला घेऊन जाण्यासाठी चिथावणी दिल्याने सायंकाळी माझे वडील, आई असे घरी असताना बापू नागरे, अर्जुन सानप, प्रसाद शेरकर रा.डोंगरगाव, चंद्रकांत लुंकड रा.लासलगाव, सागर वाघ रा.नांदगाव, दिनेश तुपे व त्याची पत्नी सोनाली तुपे हल्ली मु.नाशिक, प्रवीण सोनवणे रा.गोंदे ता.सिन्नर व एक अनोळखी महिला हे सरपंच असे लिहिलेल्या काळ्या रंगाच्या चार चाकी गाडीमध्ये तसेच दोन-तीन मोटरसायकल घेऊन आमचे घरी आले. प्रवीण सोनवणे, अनिकेत नागरे, प्रसाद शेरेकर, चंद्रकांत लुंकड हातात चॉपर घेऊन व सोबत सोनाली तुपे व सोबतची अनोळखी महिला आमचे घरात घुसले व आमचे सोबत संदीप नागरेकडे चल असा आग्रह करू लागले. मी नकार देताच हातात चॉपर घेऊन आई वडिलांना मारहाण सुरू केली. चंद्रकांत लुंकड, बापू नागरे हे माझा हात धरून बाहेर ओढू लागले. आईने हस्तक्षेप करताच प्रवीण सोनवणे व दिनेश तुपे यांनी आईची साडी ओढत, अंगलट करून विनयभंग केला तसेच चापटीने मारहाण केली. सागर वाघ यांनी वडिलांची गच्ची धरून मारहाण केली. आम्ही आरडाओरडा केल्याने नागरिक धावून आले असता तुमचे कुटुंबच संपवतो अशी धमकी देत निघून गेले अशी फिर्याद दिली. त्यामुळे मुख्य आरोपीवर भादंवी ३६३, ३७६ तर इतर आरोपींवर लासलगाव पोलीस ठाणे गु.र.नं. २६३/२२ भादंवी कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३५४, १०९, ३२३, ५०४ ,५०६, ४/२५ प्रमाणे आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास स.पो.नि.राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ऊ.नि.लहानू धोक्रट, पो.ना.संदीप शिंदे, पो.ना.औदुंबर मुरडनर करीत आहेत.

**तर ग्रामस्थ आत्मदहन करणार :** आरोपी संदीप नागरे हा तडीपार आरोपी असून त्याची परिसरात दहशत आहे . या आरोपीच्या त्रासास कंटाळून गावातील व परिसरातील विद्यार्थिनी शाळा, कॉलेज बंद करण्याच्या तयारीत आहेत, त्यामुळे सदरहू आरोपींना ४८ तासात अटक न केल्यास विद्यार्थी व नागरिक सामुदायिक आत्मदहन करतील असा इशारा ग्रामस्थांनी अजितदादा पवार, माजी मंत्री छगन भुजबळ, आ .रोहित पवार यांना समक्ष भेटून तर मुख्यमंत्री, गृहमंत्री, पालकमंत्री, महिला आयोग, जिल्हाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे .

मुख्य आरोपी संदीप काशिनाथ नागरे, अनिकेत उर्फ बापू नंदू नागरे, दिनेश लक्ष्मण तुपे, चंद्रकांत मोहनलालजी लुक्कड, प्रसाद विश्वनाथ शेरे, सचिन उर्फ अर्जुन काशिनाथ सानप, सागर वाघ यांना दि .२८ नोव्हेंबर रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे, त्यामुळे नागरिकांनी आंदोलन मागे घ्यावे . **- राहुल वाघ, स .पो .नि .लासलगाव**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी



अनुतापें तुझे राहिले चिंतन, झाला हा वमन संसार. ' केवढी अपरिमित श्रद्धा तुकाराम महाराजांची परमेश्वरावर ! अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या जागी दुसरी कोणीही व्यक्ती असती तर परमेश्वराला बोल लावला असता. पण ते तुकाराम महाराज आहेत. श्रीकृष्णाचा परम सखा सुदामा, श्रीकृष्णाची आत्या कुंती हे तर विपरीत परिस्थितीत त्याचे धन्यवाद मानून त्याची भक्ती करीत होते. कुंतीने तर त्याला ' तुझा क्षणभरही विसर न होवो म्हणून आपल्याला कायम दुःखात ठेव ' अशी जगावेगळी मागणी मागितली. आपण तर सामान्य माणसं ! आपल्यात तेवढी हिंमत नाही म्हणण्याची की मला दुःख किंवा विपरीत परिस्थितीत ठेव. पण आपल्याला जे काही मिळालं आहे तेही खूप आहे. त्याबद्दल तरी आपण त्याचे आभार मानायला हवेत. तसं तर जन्माला येताना आपण काही घेऊन येत नाही. आयुष्यभर सुखाच्या मागे लागताना पैसा, गाडी, बंगला यासाठी आपल्या आयुष्याचा मौल्यवान काळ आणि शक्ती खर्च करतो. पण जाताना सगळे इथेच ठेवून जातो. मग जे काही आपल्याला मिळाले ते त्याचीच कृपा नाही का ? आपल्याला ते ज्यांच्या कृपेमुळे मिळाले, ज्यांच्या मदतीशिवाय हे सगळे करणे अशक्य होते, त्यांचे आभार नको का मानायला ? कृतज्ञ राहणे म्हणजे स्वतःतला ' मी ' विलीन करणे. हे सगळे माझ्यामुळे नाही तर तुझ्यामुळे आहे ही भावना दृढ करणे. द्वैताकडून अद्वैताकडे जाणे. एखाद्या झाडाचे बी किती छोटे असते ! पण जोपर्यंत ते स्वतःला जमिनीत गाडून घेत नाही म्हणजेच स्वतःचा अहंकार विलीन करीत नाही तोपर्यंत त्याचे सुंदर वृक्षात रूपांतर होण्याची क्रिया होत नाही. आपण व्यवहारात अनेक प्रकारचे निर्देशांक मोजत असतो. मग तो शेअर मार्केटचा असतो, महागाईचा असतो. भुतानसारखा छोटा देश आनंदाच्या निर्देशांकात ( इंडेक्स ऑफ हॅपिनेस ) भारतासारख्या विशाल देशाच्या कितीतरी पुढे आहे. हे जसे वेगवेगळे निर्देशांक आहेत तसेच कृतज्ञतेचा निर्देशांक मोजायला काय हरकत आहे ? **क्रमशः**



## आनंदी पहाट

## अधिकाराचे महत्व अधिक

आधुनिक केसरी

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता ही देखील भिन्न असते. ह्या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून कुटुंबामध्ये एकता निर्माण करावी लागत असते. ही एकता निर्माण करण्यासाठी घरातील प्रमुख व्यक्तीच्या अधिकाराची भूमिका महत्वाची असते. आपल्या व्यक्त होण्याचा संबंध आपल्या मनाशी असतो तसंच एका व्यक्तीच्या अंतरंगाचा संबंध त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तींच्या अंतर्मनाशी असतो. त्यांचं परस्परांमध्ये एक निराळं नातं असतं. आपलं स्वतःचं, हक्काचं, आपल्या स्वप्नातलं असं कुटुंब की जे नेहेमीच आपलं हक्काचं वाटत असतं, केवळ आपल्या अंतर्मनातील भाव भावनांमुळे. आपल्या मनातलं घर आणि घरातलं मन हे कधीही एकमेकांपसून वेगळं होऊ शकत नाही. नेहमीच मानसशास्त्रीय दृष्टीकोंनातून घराचा आणि एकूणच कुटुंबाचा विचार करणं आवश्यक ठरतं. ह्यामध्ये प्रत्येक कौटुंबिक सदस्याच्या मानसिकतेचा अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातील वातावरण असणं अथवा ते निर्माण करणं निश्चितच उपयोगाचं ठरतं. अशा वातावरण निर्मितीसाठी घरातील कर्त्याच्या अधिकाराचं महत्व नेहमीच अबाधित ठरतं. काहीवेळा नसलेल्या अधिकारांचा वापर करणारे देखील सामाजिकदृष्ट्या उपद्रवी ठरत असतात. अशा व्यक्तींचं वर्तन आणि व्यवहार ह्या दोन्हीमधून व्यभिचार दिसायला लागतो. त्यामुळे अशाबाबतीत आपण सावध झालो नाहीत तर त्यांचं सावज होऊ लागतो. ह्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. अशा व्यक्ती अधिकाराचा उपयोग त्यांच्या फायद्यासाठी, स्वार्थासाठी, व्यापारासाठी करायला लागत असल्याचं दिसून येतं. तेही नसलेल्या अधिकाराचा नुसता वापर न करता ते व्यापार करू लागतात, ही बाब अधिक खेदाची आहे. एखाद्या व्यक्तीनं असलेल्या अधिकाराचा देखील वापर मर्यादेत राहून केला तरच योग्य ठरतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## प्रकटे पाषाणी | जनी संगे ||

ज्ञानास येऊ दे | प्रचितीचा गंध ||
जाण तो सुगंध | चंदनाचा ||१||
बोलणी करणी | एकरूप ज्याची ||
खाण आदर्शाची | राम जाण ||२||
ज्ञानाचिये ठायी | विनय शोभतो ||
अहंकार खातो | उभ्या जन्मा ||३||
मानपान सारे | मनाचे आभास ||
मृगजळी भास | काय कामी ? ||४||
अनुभवी वाचा | शुद्ध संतवाणी ||
प्रकटे पाषाणी | जनी संगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### विनवणी

भवसर्पपाशे तोडी। असू द्यावी तुझी गोडी।
नको लोभाची गाठोडी। हृदयाच्या गाठी सोडी।।
क्रोधाची पाषाणे फोडी। कामावरी कुरघोडी।
सोडवी सकल कोडी। मायाजाळे काडीमोडी।।
सूचती अक्षरे थोडी। काही ओबडीधोबडी।
नामामृते ऐसी गोडी। मज जवळी तू ओढी।।
गुरुमाऊली वाटाडी। रेणुका पुरवे लाडी।
चंद्रहासे केली खोडी। कैवल्याच्या पार होडी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## परमेश्वर जाणण्याचा मार्ग



आधुनिक केसरी

जो कोणी एखादे कृत्य करतो त्यात तो करणारा असतो; स्वतः निराळा राहूनही त्या कृत्यात तो अंशरूपाने असतो. न्यायाधीश निकाल देतो तेव्हा 'अमक्या न्यायाधिशाने निकाल दिला' असे म्हणतो. म्हणजेच काय की, तो न्यायाधीश जरी वेगळा असला तरी दिलेल्या निकालामध्ये तो असतोच. त्याचप्रमाणे परमात्म्याने हे जे सर्व जग उत्पन्न केले, त्या प्रत्येकात तो अंशरूपाने आहे. म्हणूनच, सर्व चराचरामध्ये ईश्वर पाहावा असे सांगतात त्याचेही कारण हेच आहे. या सर्व चराचर सृष्टीमध्ये ईश्वर पाहायला आपली तितकी प्रबळ इच्छा व्हावी लागते. देव आहे ही पुष्कळांची नुसती भावनाच असते, पण ती बरोबर जाणली जात नाही, आणि ती बरोबर जाणण्याची इच्छा होणे हेच खरे व्हायला पाहिजे असे असते, अशी ज्याला इच्छा झाली त्याचे अर्धे काम झाले असे म्हणावे. तशी इच्छा झाल्यावर, देव पाहण्यासाठी काय मार्ग आहेत हे तो पाहू लागतो. त्याला पुष्कळ निरनिराळे मार्ग सांगणारे भेटतील. कोणी सांगतील की संन्यास घेतला म्हणजे ताबडतोब ईश्वराची प्राप्ती होईल; कुणी सांगतील की ब्रह्मचारी राहिले म्हणजे देव भेटेल, कुणी सांगतील गृहस्थाश्रम वेदाने श्रेष्ठ सांगितला आहे. तसे वागले म्हणजे देव आपल्या घरी चालत येईल; कुणी याग, कुणी हठयोग, तर कुणी जपतपादि साधने सांगतील. अशा मतामतांच्या गोंधळात आपण काय करावे ? तर ज्यांनी तो मार्ग चोखाळला आहे, त्यांनी काय केले ते पाहावे. असा मार्ग कुणी चोखाळला ? तर जे संत लोक आजपर्यंत झाले त्यांनी. त्या सर्वांनी देवाची प्राप्ती करून घेतली आहे. म्हणून ते काय सांगतात ते पाहावे. आपण घराच्या बाहेर जायला निघालो म्हणजे वाट चालू लागतो. जिथे चार वाटा फुटतात तिथे पाट्या लावलेल्या असतात, आणि जिकडे जायचे ते त्यावर लिहिलेले असते. समजा आपल्याला पंढरपूर जायचे आहे; आता केवळ एखादा रस्ता सावलीचा आहे म्हणून त्याच रस्त्याने जाऊ लागलो तर आपण पंढरपूरला पोहोचू का ? पंढरपूरचा मार्ग उन्हाचा म्हणून आपण तो सोडून देऊन सावलीच्या रस्त्याने जावे, तसेच आपले झाले आहे. आपण विषयात आनंद मानून त्यातच रंगून गेलो आहोत, आणि त्यामुळे देवाकडे जाणारा रस्ता चुकलो आहोत. म्हणूनच, संत सांगत असतात त्या वाटेनेच जाण्याचा निश्चय करावा, आणि तो मार्ग जरी कठीण वाटत असला, तरी तो देवाकडे जातो हे लक्षात ठेवावे. **आजचे बोधवचन आहे** - संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भितीच नाही.श्रीराम समर्थ

## अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

विज्ञानात बदल होतो हे खरे; म्हणजे काल प्रस्थापित असलेला सिद्धांत आज चुकीचा किंवा अपुरा असल्याचे सिद्ध होते आणि त्याचा त्याग केला जातो. परंतु वैज्ञानिक क्षेत्रात घडणाऱ्या बदलाच्या प्रक्रियेचे हे वर्णन दिशाभूल करणारे आहे. एकाकाळी प्रस्थापित झालेला सिद्धांत मागे पडतो याचा अर्थ तो त्याहून व्यापक अशा सिद्धांतात समाविष्ट केला जातो, किंवा त्यात किंचित त्रुटी दिसून आल्याने त्यात बदल करण्यात येतो. पण हा बदल सर्वमान्य असतो. तशी स्थिती अध्यात्माची नाही. या क्षेत्रात एका आध्यात्मिक सिद्धांताचे उणेपण लक्षात येऊन तो मागे टाकला गेला आणि दुसरा त्याच्या जागी आला असे होत नाही. आध्यात्मिक सिद्धांताचे खंडण कधीच निर्णायक होत नाही, आणि त्यामुळे शेकडो आध्यात्मिक सिद्धांत परस्परविरुद्ध असूनही अध्यात्माच्या रिंगणात कायम असतात. एवढेच नव्हे, तर प्रत्येक धर्माचे, प्रत्येक समाजाचे अध्यात्म वेगळे असते. याही बाबतीत विज्ञान आणि अध्यात्म यांत भेद आहे. विज्ञान इथूनतिथून एक आहे, त्यात भारतीय विज्ञान आणि पाश्चात्त्य विज्ञान, किंवा हिंदू विज्ञान आणि ख्रिस्ती विज्ञान असा भेद आढळत नाही. परंतु अध्यात्मांत मात्र भारतीय अध्यात्म आणि पाश्चात्य अध्यात्म, किंवा हिंदू अध्यात्म आणि ख्रिस्ती अध्यात्म असा भेद आढळतो. परंतु असे असले तरी भिन्न अध्यात्मव्यवस्थांत थोडेबहुत समान



असणारे अनेक सिद्धांत आहेत. त्यांपैकी अनेक सिद्धांत म्हणजे एकाच सिद्धांताची अनेक थोडीफार वेगळी पाठांतरे (VERSIONS) असतात. त्यामुळे अध्यात्माच्या प्रमुख निष्कर्षांचा सारांश देणे शक्य आहे.
हे निष्कर्ष भारतीय अध्यात्मात दोन प्रकारचे आहेत. (१) एक तर ईश्वरवादी. म्हणजे ईश्वरकल्पना प्रधान मानून तिच्या अनुरोधाने विचार करणारे, आणि (२) ईश्वरकल्पनेचा उपयोग न करता, परंतु आत्म्याला या विश्वात प्राधान्य देऊन विचार करणारे. यांपैकी ईश्वरवादी विचारात ईश्वर सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वगुणसंपन्न असा, विश्वाचा निर्माता आणि नियंता आहे असे मानले जाते. ईश्वर आणि मनुष्य यांच्या संबंधाविषयी अनेक मते असली तरी ती सर्व बहुधा एकाच मताची पाठांतरे आहेत. ते म्हणजे ईश्वर भक्तीने प्रसन्न होतो. प्रार्थनेने तो ओलावतो, त्याला अनन्यभावाने शरण गेल्याने तो आपली ईप्सिते पुरी करतो, आणि शेवटी भक्ताला आपल्यात सामावून घेतो. ईश्वरात लीन होणे ही मनुष्यजीवनाची परमावधी आहे. त्याहून मोठे सुख नाही, कृतार्थता नाही.(२) दुसरा (ज्ञानमार्गीयांचा) अध्यात्मविचार काहीसा भिन्न आहे. याही विचारात अध्यात्माचे अंतिम उद्दिष्ट आत्म्याची मुक्ती हेच आहे. पण ही मुक्ती ईश्वरभक्तीने मिळत नसून ती एक प्रकारच्या ज्ञानाने मिळते असे मानले जाते. हे ज्ञान प्रामुख्याने आत्मज्ञान असते. म्हणजे आपल्या खऱ्या, पारमार्थिक स्वरूपाचे ज्ञान झाल्याने आपण मुक्त होतो असा हा सिद्धांत आहे. ज्ञानानेच मोक्ष मिळतो, 'ज्ञानादेव हि कैवल्यम्' ही कल्पना नीट समजावून घेणे महत्त्वाचे आहे. भारतीय तत्त्वज्ञानात तत्त्वज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट मोक्ष किंवा मुक्ती हेच मानलेले आहे. मनुष्य विविध प्रकारच्या दुःखांनी पीडित असतो, आणि त्यामुळे या दुःखांचा नाश करण्याच्या उपायांचा शोध सुरू होतो. हा दुःखनाश औषधादी आधिभौतिक उपायांनी किंवा यज्ञयागादी आधिदैविक उपायांनी साध्य होत नाही, कारण या उपायांनी होणारा दुःखनाश निश्चित आणि कायमचा नसतो. असा कायम आणि समूळ दुःखोच्छेद करण्याचा उपाय शोधण्याकरिता आध्यात्मिक मार्गाकडे वळावे लागते. येथे एक गोष्ट नमूद करणे अवश्य आहे. **क्रमशः**

दि. य. देशपांडे

# महाराष्ट्र- कर्नाटक सीमावाद; आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जत तालुक्यातील गावांवर कर्नाटकमधील भाजप सरकारने दावा केल्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद पुन्हा उग्र झाला असताना, या प्रकरणावरील प्रलंबित सुनावणी बुधवारी ३० नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. सर्वोच्च न्यायालयातील या सुनावणीपूर्वी कर्नाटक सरकारने सीमावादाला राजकीय रंग दिला असून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई मंगळवारी दिल्लीत दाखल होणार आहेत. बोम्मई दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेणार आहेत. आत्ता तरी सीमावादाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ असल्याने केंद्रीय गृहमंत्रालयाला हस्तक्षेप करता येणार नाही. मात्र, बोम्मई केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशीही चर्चा करण्याची शक्यता आहे. सीमावादासंदर्भात कर्नाटकच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करणार असल्याने कर्नाटक सरकार या विषयावर आक्रमक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बोम्मई यांनी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती शिवराज पाटील यांची समिती नेमली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांची बैठक घेतली आहे. राज्य सरकारने मंत्री चंदक्रात पाटील व शंभूराज देसाई यांची समिती नेमली असून न्यायालयीन प्रक्रियेसंदर्भात



समन्वय साधणार आहेत. कर्नाटक सरकारने सोलापूर, अक्कलकोट आणि जतमधील ४० गावांवर हक्क सांगितला असला तरी, एकही गाव कर्नाटकमध्ये जाऊ दिले जाणार नाही, असे प्रत्युत्तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना दिले आहे. मात्र, बोम्मई यांच्यावर कर्नाटकमधून दबाव वाढत असून सर्वपक्षीय बैठक घेण्याची मागणी होत आहे. काल माजी मंत्री जयंत पाटील यांचे पुत्र प्रतीक यांच्या विवाह सोहळयाला उपस्थित राहण्यासाठी एकीकरण समितीचे पदाधिकारी गेले होते. त्यांनी मंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली. देसाई यांनी ३ डिसेंबर रोजी बेळगावला येणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्- कर्नाटक सीमाप्रश्नी बेळगाव येथे जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करावी अशी भूमिका मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीची आहे. त्यानुसार मी आणि अन्य एक समन्वयक मंत्री शंभूराज देसाई ३ डिसेंबर रोजी बेळगाव दौरा करत कार्यकर्त्यांशी चर्चा करणार आहोत. चर्चेतून नक्कीच मार्ग निघेल.

### सीमाभाग समन्वय मंत्री ३ डिसेंबरला बेळगाव दौऱ्यावर

कोल्हापूर : महाराष्ट्र सीमाभाग समन्वय मंत्र्यांचा ३ डिसेंबर रोजी बेळगाव दौऱ्यावर जात आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्न समन्वयक मंत्री म्हणून उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांची गेल्या आठवड्यात नियुक्ती केली. लगेचच मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष दीपक दळवीव इतरांनी उभयमंत्र्यांना बेळगावला भेट देऊन चर्चा करण्याचे आवाहन केले होते.

# विहिरीत विषारी साप; वनपरिक्षेत्र कर्मचारी यांनी दिले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे सोमवारी गावापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या अलकाबाई चव्हाण यांच्या शेतात गटनंबर २३१ मधे विहीरीत अतिशय विषारी साप सकाळी आठ वाजता आढळून आला.विहीरीचे संपुर्ण बांधकाम झालेले असताना शुद्धता काहीतरी भक्ष्याच्या शोधात विहीरीत आला होता. साप हा  बसलेला लपून बसला असता गोकुळसिंग राजपूत पत्रकार यांच्या पाहण्यात आले. यांनी तात्काळ अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांच्याशी संपर्क साधून त्यांना विषारी नागा विषयी माहीती देण्यात आली.वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांनी तात्काळ वनकर्मचारी व सर्पमित्र निलेश उदयभरे जाळीचादेव यांना पाठवून सापाला रिक्सो केला. या विषारी नागाला  सुरक्षितरित्या विहीरीतून बाहेर काढून सर्पमित्रांनी त्याला सावळदबारा वनकर्मचाऱ्यांच्या मदतीने जाळीचादेव जंगलात सुखरूप सोडून दिले. सर्पमित्र निलेश उदयभरे यांनी या विहीरीत भक्ष्यासाठी दबा धरून बसलेला ५ फुट लांबीचा आणि १० किलो वजनाच्या भला मोठा विषारी साप आढळून आला. या विषारी नागाला सर्पमित्र, वनकर्मचारी व गावातील नागरिक यांच्या मदतीने सुमारे दोन तास लागले. शेवटी मोठ्या शिताफीने विषारी नागाला पकडले आणि वनअधिकाऱ्यांच्या मदतीने जाळीचादेव डोंगरात वनक्षेत्रात नेऊन त्याला सुरक्षित ठिकाणी सोडून दिले असल्याची माहिती वनरक्षक सावदबारा यांनी दिली. सावळदबारा वनकर्मचारी वनपाल राठोड, वनरक्षक खरडे, वाघ, चाथे व शिपाई शेख इशुब पठाण,अबांदास सुर्यवंशी गावातील नागरिक दिपक नप्ते, गणेश देशमुख, संदीप राजपूत, संतोष गावडे, विजू मोरे, शंकर बगाडे, संतोष लबाड, गोलू पुजारी, गोपाळ चव्हाण, दिपक गावडे आदींसह उपस्थित होते. परिसरातील ३० ते ३५ गावात कुठेही साप निघाला की पकडायला जातो आणि त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करतो. असा हा सर्पमित्र सध्या सावळदबारा परिसरात उत्सुकतेचा विषय झाला आहे सापाबद्दल असलेले नागकांचे गैरसमज दूर करून देत आहे क्षणाचाही विलंब न लावता पोहचतो गावात कुणाच्या घरी साप निघाला की निलेशला फोन येतो रात्र असो, पाऊस असो,ऊन असो की वारा असो सापाला पकडून तो जीवदान देतो. या मोबदल्यात तो कोणत्याही पैसा घेत नाही.

# सुषमा अंधारेंचा चित्रा वाघ यांना टोला

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** एकीकडे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरून वाद चिघळला असताना दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचा कलगीतुरा रंगू लागला आहे. त्यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजपा नेते सुधांशू त्रिवेदी यांनी छत्रपती शिवरायांविषयी केलेल्या वक्तव्यांमुळे वाद सुरू झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा चित्रा वाघ आणि ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यामध्ये कलगीतुरा सुरू झाल्याचं चित्र दिसू लागले आहे. आज नवी मुंबईत बोलताना चित्रा वाघ यांनी सुषमा अंधारेंना लक्ष्य केल्यानंतर आता अंधारेंनीही त्यावर खोचक शब्दांत प्रत्युत्तर देणारे ट्वीट केले आहे. चित्रा वाघ यांनी सुषमा अंधारेंना नक्कल करून टाळ्या मिळवत असल्याचा टोला लगावला."प्रत्येकाला बोलायचा अधिकार आहे. आमची नक्कल करून त्या शिट्ट्या आणि टाळ्या मिळवतात. मात्र मागील अडीच वर्षांत महाविकास आघाडी सरकारने काय दिवे लावले हे जरा महाराष्ट्राला सांगा. त्यांच्या प्रत्येक विधानावर बोललेच पाहिजे, असे काहीही नाही. त्या त्यांचे काम करत आहेत, आम्ही आमचे काम करत राहू. असे कितीही आडवे आले तरी आम्हाला काही फरक पडत नाही. आमचे नाव घेऊन त्यांचे दुकान चालत असेल, तर आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत, असे चित्रा वाघ म्हणाल्या.

# अमळनेर येथील प्रदीप पाटील यांना खान्देशना जीवन गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** दि २७ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११:०० वा.  जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय अल्पबचत भवन येथे कल्याण येथील आख्या खान्देशी लोकांसाठी लढा देणारी लोकांना  एकत्रित करणारी संघटना 'खान्देशना एल्गार' व  जळगाव जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी सुप्रसिद्ध हजरत बिलाल बहुउद्देशीय संस्था जळगाव तर्फे सामाजिक बांधिलकी जपत अमळनेर येथील पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचा एम.एस. डब्ल्यू प्रथम वर्षाला शिकणारा प्रदिप गोकुळ पाटील या विद्यार्थ्यांचे सामाजिक, शैक्षणिक, वेद्यकिय, देशसेवा, क्षेत्रात करीत असलेले उल्लेखनीय कार्य पाहून कल्याण येथील खान्देशना एल्गार व हजरत बिलाल संस्थे तर्फे कार्यक्रमात उपस्थिती प्रमुख पाहुणे विजय पवार (शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव) विजय चव्हाण (खान्देशना एल्गार संघटना कल्याण राष्ट्रीय अध्यक्ष), प्रा. रफिक जमिल शेख , (जी.एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट विभाग प्रमुख, जळगाव), जनाब करीम सालार (अध्यक्ष ईकरा एज्युकेशन संस्था, जळगाव), सै. अकिल सै.अब्दुल्ला यांच्या हस्ते प्रदिप गोकुळ पाटील यांना  खान्देशना जीवन गौरव  पुरस्कार २०२२ देऊन  सन्मानित करण्यात आले. यावेळी  कार्यक्रमात मनोज कोल्हे (क्राइम रिपोर्टर मंत्रालय) मुकुंद दादा सपकाळे (जनक्रांती मोर्चा संघटना अध्यक्ष), शुभांगीताई बिर्हाळे (जळगाव जिल्हा खान्देशना एल्गार जिल्हा महिला अध्यक्ष), हजरत बिलाल संस्थेचे अध्यक्ष सै. अकिल पहेलवान , तसेच  प्रहार संघटनेचे जळगाव जिल्हा अध्यक्ष निलेश बोरा उपस्थित होते.



# मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डींच्या बहिणीला तेलंगणात अटक, गाड्यांचीही जाळपोळ

आधुनिक केसरी न्यूज

**वारंगल :** आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्या बहिणीला अटक करण्यात आली आहे. वाय एस शर्मिला असे त्यांचे नाव आहे. तेलंगणातील वारंगल जिल्ह्यात वाय एस शर्मिला यांचे समर्थक आणि मुख्यमंत्री केसीआर यांच्या तेलंगणा राष्ट्र समितीच्या (टीआरएस) कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला होता. याप्रकरणी वाय एस शर्मिला आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे.

वाय एस शर्मिला यांचा वाय एस आर तेलंगणा पक्ष आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून त्यांनी तेलंगणात पद यात्रा काढली आहे. आतापर्यंत शर्मिला यांच्या पदयात्रेने ३ हजार ५०० किलोमीटरचे अंतर पार केलं आहे. त्यात शर्मिला या वारंगल जिल्ह्यातील नरसांपेत होत्या. तेव्हा जनतेला संबोधित करताना शर्मिला यांनी स्थानिक टीआरएस आमदार पेड्डी सुदर्शन रेड्डी यांच्यावर टीका केली. वाय एस शर्मिला यांनी केलेल्या टीकेनंतर टीआरएसचे कार्यकर्ते संतप्त झाले. टीआरएसच्या कार्यकर्त्यांनी वाय एस शर्मिला यांच्या पदयात्रेतील वाहनांवर हल्ला करत जाळपोळ केली.

# अंजोळा येथे कापूस उत्पादकता वाढ प्रकल्पांतर्गत शेती शाळा उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील अंजोळा येथे राज्य पुरस्कृत कापुस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास प्रकल्प अंतर्गत एस जी वाघ तालुका कृषी अधिकारी सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पुंडलिक देवराव निकम यांच्या शेतावर शेती शाळा वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. शेती शाळा वर्गात शेतकरी बांधवांना कापूस वेचताना घ्यावयाची काळजी व योग्य वेळी वेचणी झाली नाही तर कापसाच्या प्रतवारी वर होणारा परिणाम, तसेच कापूस वेचणी  पाश्चात व्यवस्थापन व विक्री याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यात रब्बी पेरणी हंगाम चालू असल्याने  रब्बी हंगामात जास्तीत जास्त पौष्टिक तृणधान्य पिकांची पेरणी करावी असे आवाहन संपूर्ण तालुक्यात कृषि विभागामार्फत  करण्यात येत आहे. तसेच पौष्टक तृणधान्यचे मानवी आहारात किती महत्व आहे याविषयी सविस्तर माहिती कृषि सहाय्यक सतिष बोरसे यांनी सांगितली कार्यक्रमास गावचे सरपंच व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## केंद्र सरकारची भूमिका

आधुनिक केसरी

इतरांचे धर्मातर घडवण्याच्या कृतीचा धार्मिक स्वातंत्र्यात 'हक्क' म्हणून समावेश होत नाही. तसेच फसवणूक, बळजबरी किंवा आमिष दाखवून एखाद्या व्यक्तीचे धर्मातर घडवून आणण्याचा 'अधिकार' स्वीकारार्ह ठरत नाही, अशी भूमिका केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात मांडली. बळजबरीने धर्मातराचा धोका असल्याने त्यावर अंकुश ठेवणारे कायदे महिला तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास समाजघटकांच्या संरक्षणासाठी आवश्यक असल्याचेही केंद्राने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले आहे. बळजबरीने केले जाणारे धर्मातर रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे निर्देश राज्यांना द्यावेत, अशी विनंती भाजपचे नेते अॅड. अश्विनी कुमार उपाध्याय यांनी जनहीत याचिकेद्वारे केली आहे. त्यावर न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार यांच्या खंडपीठाने केंद्राला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, सर्व नागरिकांच्या सद्‌सद्विवेकाचा अधिकार हा एक अत्यंत मौल्यवान हक्क असून त्याचे संरक्षण कार्यपालिका आणि विधिमंडळाने करणे आवश्यक आहे, असेही केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. ओदिशा, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, झारखंड, कर्नाटक आणि हरयाणा या राज्यांनी बळजबरीने होणारे धर्मातर रोखण्यासाठी कायदे केले आहेत. घटनेच्या अनुच्छेद २५ नुसार 'प्रचार' या शब्दाचा अर्थ आणि आशयावर संविधान सभेत सविस्तर चर्चा झाली होती. अनुच्छेद २५ नुसार प्रचार मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केल्यानंतरच या शब्दाचा समावेश संविधान सभेने अंतर्भाव केला, असे केंद्राने म्हटले आहे. संबंधित राज्यांकडून आवश्यक ती माहिती घेतल्यानंतर तपशीलवार प्रतिज्ञापत्र सादर करा, असे निर्देश न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार यांनी केंद्राला दिले. तसेच आम्ही धर्मातराच्या विरोधात नाही, पण बळजबरीने होणाऱ्या धर्मातराच्या विरोधात आहोत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## साताऱ्याचे श्री खंडोबा देवस्थान जेजुरीचे प्रतिरूप



ज्योती संजय पाटील (वाळुंज)
ग्रंथपाल, CSMSS कृषि महाविद्यालय,
कांचनवाडी, औरंगाबाद.

आधुनिक केसरी

**औरंगाबाद हे जगातील एक सर्वाधिक वेगाने वाढणारे औद्यौगिक शहर आहे. हे मराठवाड्याच्या व त्यासोबतच महाराष्ट्र पर्यटनाच्या राजधानीचे शहर आहे.औरंगाबाद शहरामध्ये सातारा हे छोटेसे खेडे होते, परंतू आता ते महानगर पालिकेच्या हद्दित आले आहे. ते औरंगाबाद शहरापासून अवघ्या ८ कि.मी. अंतरावर आहे. सातारा हे अनेक वर्षापूर्वी औरंगाबादच्या दक्षिणेला उंच डोंगराच्या कुशीत आणि दाट झाडी मध्ये असलेले जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी श्री खंडोबाचे भव्य हेमाडपंथी मंदिर आहे. महाराष्ट्राचे पूजनीय आणिलोकप्रिय दैवत असलेल्या खंडोबाचे जागृत देवस्थान सातारा येथे आहे.**

येथील खंडोबा यात्रा महादेवस्थान जेजूरी प्रमाणेच लोकप्रिय आहे. म्हणून याला जेजूरीचे प्रतिरुप मानतात. श्री खंडोबा दैवत जागृत, नवसाला पावणारे व सातारा परिसराला, औरंगाबाद शहराला भरभराट देणारे मानले जाते. शहराच्या दक्षिण भागात वसलेल्या आणि गेल्या झपाटयाने वाढलेल्या साता-यात येळकोट यळकोट जय मल्हार हा जयघोष घुमायला लागला आहे. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात या देवाचा मोठा उत्सव साजरा केला जातो. मल्हारी मार्तड, श्री खंडोबा हा संबंध राज्यातील अनेकविध जमातीचे श्रध्दास्थान, कुलदैवत म्हणुन हे खंडोबा देवस्थान प्रसिध्द आहे. श्री खंडोबा अनेक नावांनी पुजला जातो. त्यामध्ये मैलार, मल्हारी मार्तंड, म्हाळसापती, म्हाळसाकांत ही नावे सर्व परिचित आहेत.मल्हारी मार्तंड श्री खंडोबाचे महाराष्ट्रात ६ जागृत ठिकाणे आहेत. ५ ठिकाणे हे कर्नाटकात आहेत.

**साता-याची भौगोलिक व ऐतिहासिक ओळखः-**
शहराच्या मुख्य बसस्थानकापासून सूमारे ११ कि.मी. (दक्षिणेस) अंतरावर रमणिय सृष्टी सौदर्याने नटलेल्या डोंगर पायथ्याच्या खाली मध्यम उंची स्थानी सातारा हे ठिकाण आहे. अत्यंत वैभवशाली दिवस खेडे असतांना या गावाने उपभोगलेले आहेत. कारण सातारा निजाम राजवटीत जहागिरीचे मुख्य ठिकाण होते. हैद्राबाद संस्थानात (बारागाव) जहागिरी असलेले सातारा गाव गावकोटात सूरक्षित होते. दोन वेशी (तटबंदीचे मुख्य व्दार) असेलेल्या सातारा गावात जहागिर वाडा, न्यायमुर्ती कचेरी आणि इतर कारभारांचे एक चौक, दोन चौक असे भव्य वाडे होते. या चिरेबंदी वाड्यांमध्ये हैद्राबाद संस्थानच्या जहागिरीचा कारभार चालत असे. न्यायदान पासून टपालापर्यत सर्व कामें इथून चालत असे. पूर्वी शके १४००ते १५०० दरम्यान मुळ खंडोबा देवस्थान हे साताऱ्याच्या दक्षिणेस असलेल्या मोठया डोंगरावर होते. हे स्थान आजच्या साताऱ्या पासून ५ कि.मी. अंतरावर आहे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार लोक उंच डोंगरावर सूरक्षित ठिकाणी आपली वसाहत करत होते आणि त्याठिकाणी आपल्या आराध्य देवतांची स्थापना करत असतं. आपले आराध्य दैवत हे बहूतेक ठिकाणी डोंगरावर किंवा किल्ल्यावर असल्याचे आपल्याला दिसून येते. जिथे जिथे लोकवस्ती तिथे तिथे आपले कूल दैवत, कूलस्वामिनी, पिर-पैगंबर यांची प्रतिष्ठापना ते लोक करत असत. त्यामुळे पूर्वीचे मूख्य खंडोबा देवस्थान हे डोंगरावर होते. आजही त्या ठिकाणी भग्नावस्थेत गवळी लोकांचे वाडे नामशेष होत चाललेले गोलाकार चौकोनी पाया भरणीचे दगड रांगेत लावलेले दिसून येतात. अगदी डोंगरात एका टोकावर भव्य काळया दगडावर कोरीव काम केलेले हेमाडपंथी पुर्वाभिमुख श्री खंडोबा मंदीर उभारलेले आहे. हे मंदीर एका चौथ-यावर चोहोबाजूनी दगडीकाम केलेल्या स्वरुपाचे आहे. त्याच ठिकाणी निवासी खोल्या जमिनदोस्त झालेल्या दिसतात. फक्त मुर्तीवरील कळसाचा भाग तेवढा शिल्लक आहे त्यावर देखिल काटेरी झाडे-झूडपे यांची वाढ झालेली दिसून येते. हे ऐतिहासिक मंदिर औरंगाबाद जवळील बोरसर



येथील कूलकर्ण्यांनी बांधल्याचे सांगतात. तर इ.स.१७६६ मध्ये अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे सांगितले जाते. परंतू मंदिराच्या अपूर्ण स्थितीमुळे बांधकाम अपूर्ण राहिले की त्याची हानी झाली याची माहिती मिळत नाही. मंदिराच्या गाभा-यात एका शिळेवर घोडयावर स्वार झालेले श्री खंडोबा दर्शविण्यात आलेले आहे. हे मंदिर कोणी कुठल्या काळात निर्माण केले याचा उल्लेख कोठेही आढळून येते नाही. वर्षातून एकदा पौष महिन्याच्या तिस-या रविवारी सातारा गावातून पठारावर पालखी (खंडोबाची) देव भेटीला जाते साता-याच्या या डोंगरामध्ये दोन लेण्या पहायला मिळतात. तर डोंगराच्या वरच्या बाजूला सासू- सूनेचे दोन तलाव आहेत. वरच्या एका लेणीमध्ये खंडोबाचे जाते आहे. त्या जात्यातून पूर्वी भंडारा पडत असत अशी अख्यायिका आहे. **खंडोबा मंदिराची माहिती :** औरंगाबाद शहराच्या जवळ सातारा गावात खंडोबाच्या जागृत अकरा देवस्थानापैकी चौथे स्थान म्हणून ओळखले जाते. खंडोबा मंदिर डोंगराच्या पायथ्याशी आहे. पेशवे काळातील स्थापत्यशैलीचे अतिशय सूंदर मंदिर असून मराठा वास्तूशैलीतील विरांनी या मंदिराचे बांधकाम केल्याचे सांगण्यात येते. मंदिर परिसर हा गर्भग्रह, सभा मंडप, व भव्य प्रवेशव्दार यामध्ये विभागलेला असून एका उंच चौथ-यावर मंदिर बांधलेले आहे. मंदीराच्या गाभाऱ्याखाली एक पूरातन बारव आहे तीला जाण्यासाठीचा रस्ता आता बंद करण्यात आला आहे. या वर्षीच्या परतीच्या पावसाने ही बारव पूर्ण क्षमतेने भरली आहे. त्यामुळे मंदिराच्या गाभाऱ्या खालून पाण्याचा पाझर वाहतांना आपणास दिसतो. प्रवेशद्वाराचे बांधकाम साधे असून मंदिरात प्रवेश करण्यासाठी आठ पाय-या आहेत. आवाराचा पूर्व दरवाजा मोठा असून दरवाज्यावर नगरखाना आहे. उत्तर बाजूला दिपमाळ तर मंदिराच्या पूर्वेस मंडपाचा चौथरा दिसतो. या चौथ-याच्या चारही बाजूच्या भिंतीचा तळ व मंडपाचे १९ खांबाचे तळ नजरेस पडतात. मंदिराचे बांधकाम अर्धवट झाल्याचे दिसते. मंदिरगाभारा बाहेरुन ताराकाकृती करण्यात आले आहे. मंदिरातील अर्धमंडपात वरच्या भागात गजलक्ष्मी, शिवशाई, विष्णू, आणि कृष्णाची सूंदर शिल्प कोरलेले आहेत. मुख्य गर्भगृहात जाण्यापूर्वी अंतराळ भागात दक्षिण दिशेला ब्रम्हाची उत्पत्ती व शिल्प मालिका कोरलेली आहे. त्याखालील अलंकार पटटी मध्ये पोपटपक्षाची अलंकृत असलेली शिल्प पटटी आहे. गर्भगृहाच्या मधिल भागात श्री मच्छ, श्री कच्छ, श्री वराह, श्री नरसिंह, श्री वामन अशा दहा विष्णू अवतार कोरलेले आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या लगाड बिंबा वर गणेश मूर्ती कोरलेली आहे. त्यावर नंदीवर बसलेले शिवपार्वतीची मूर्ती कोरलेली आहे. खंडोबाची मूर्ती मध्यम उंचीच्या दगडावर विराजमान झालेली आहे. ती मूर्ती पाषाणाची असून त्याची ऊंची साधारण ३ फुट असल्याचे समजते. ती मूर्ती पूष्प, त्रीपूडगंध, बेल, भंडारा याने माखलेली असते. दूस-या बाजूला अभिषेकाची मूर्ती व महादेवाची पिंड आहे मूर्तीच्या उजव्या बाजूला घोडयावर स्वार झालेली मूर्ती आहे. या मूर्तीचे दर्शन घेतले की समोरचे दृश्य पहाताच या मल्हारी मार्तंडाला आपण खंडोबा का म्हणतो याचा उलगडा होतो. ही दिपमाळ काळया पाषाणात असून त्याच्या दिवटया या हत्ती मूखासारख्या आहेत.तेथे असलेल्या पिंपळाच्या झाडाखाली पहिले ओटा (पार) होता. या गडावर पूर्वी भंडारा पडत असे अशी अख्यायिका आहे. खंडोबाचा गड चढल्यावर पठाराच्या मध्यभागी सासू-सूनेचे एकत्रित तळे आहे. त्या तळयाबदद्‌ल असे सांगण्यात येते की, सासू-सूनेच्या भांडणात सासू सूनेच्या छातीवर बसली. काहीही अपराध नसतांना सासूने छळ केला म्हणून सूनेने सासूला शाप दिला की, तूझ्या तळयाचे पाणी घाण होईल, त्यामध्ये जिवजंतू पडतील आणि मी जर सत्य असेल तर माझ्या तळयातील पाणी स्वच्छ राहिल. आजही आपण निर्खून पाहिल्यास असे दिसते की एकत्र असलेले हे दोन तळे एकाचे पाणी थोडे गढूळ जिवजंतू असलेले दिसते. दूस-या तळयाचे पाणी अगदी स्वच्छ दिसते. भक्तांच्या भक्तीला प्रसन्न होवून खंडेराया सातारा गावात आले अशी कथा आहे. दरवर्षी चंपाषष्ठीला येथे मोठी यात्रा भरते. या दिवशी पूरण पोळी, खोबरे, रेवडी, भरीत व रोडग्याचा नैवेद्य दाखवला जातो व यळकोट यळकोट जय मल्हार या गजरात भंडा-याची उधळण केली जाते.पौष पौर्णिमा, सोमवती अमावस्या, चंपाषष्ठी, माघ पौर्णिमा, याला येथे जत्रा भरते.

**चंपाषष्ठी :** या दिवशी मार्तंड भैरवाने मल्ल्या सुराचा वध केला तेव्हा देवांनी व गणांनी व ऋषिंनी देवाची पूजा चाफयाच्या फुलांनी केली व तो दिवस षष्ठीचा होता. म्हणून त्याला चंपाषष्ठी असे म्हणतात. चंपाषष्ठीला गावात देवाची मिरवणूक काढली जाते. दिक्षितांचे वंशज दांडेकर परिवार परंपरेनुसार रुद्राभिषेक करून खंडेरायाला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात व संध्याकाळी देव परत देवळात येतात. विजया दशमीला देवाची पालखी गावशिवारात मिरविली जाते. हा सोहळा पाहण्यासाठी राज्यातसील व राज्याबाहेरील भाविक गर्दी करतात. चंपाषष्ठीला राक्षसांवर भगवंतांनी विजय मिळवला याचा आनंद व्यक्त करण्यासाठी खंडेरायाचे ६ दिवसांचे नवरात्र बसवून मंदिरात व घरी उत्सव साजरा करतात. शेवटच्या दिवशी देव सिमोल्लंघन करतात.

## उत्तर कोरियाचा आततायीपणा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग ऊन हा आपल्या विक्षिप्तपणाबद्दल जगात प्रसिद्ध आहे. त्याच्या विक्षिप्तपणाचे किस्से जगभर प्रसिद्ध आहेत. हुकूमशहा किम जोंग ऊन हा जितका विक्षिप्त आहे तितकाच तो आक्रमक राष्ट्रप्रमुख आहे. मागील काही वर्षात त्याने अनेक क्षेपणास्त्र चाचण्या करुन अमेरिका, जपान आणि दक्षिण कोरिया या आपल्या शत्रू राष्ट्रांना इशारा देण्याचा प्रयत्न केला. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना त्याने काही प्रमाणात संयमाची भूमिका स्वीकारली होती कारण दोघांचीही जातकुळी एकच होती मात्र आता ज्यो बायडेन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून हुकूमशहा किम जोंग ऊन पुन्हा आक्रमक झाला आहे. अमेरिकेसोबत दक्षिण कोरियाने लष्करी सराव सुरू केल्याने हुकूमशहा किम जोंग ऊन याचा तिळपापड झाला म्हणूनच त्याने अमेरिका आणि दक्षिण कोरियाला इशारा देण्यासाठी एकाच वेळी तब्बल २३ क्षेपणास्त्रे डागली.**

त्याच्या या आक्रमक भूमकेमुळे जगभर खळबळ उडाली. उत्तर कोरियाने डागलेल्या या २३ क्षेपणास्त्रांपैकी काही क्षेपणास्त्रे दक्षिण कोरियाच्या सागरी सीमेजवळ पडली तर काही क्षेपणास्त्रे जपानच्या सीमेजवळ पडली. उत्तर कोरियाच्या या आक्रमक भूमीकेमुळे दक्षिण कोरिया आणि जपान या देशाची चिंता वाढली आहे. उत्तर कोरियाने डागलेल्या या क्षेपणास्त्रांची परतफेड म्हणून दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाच्या दिशेने तीन क्षेपणास्त्रे डागली. सुदैवाने ती उत्तर कोरियात पडली नाही. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर जपानच्या संरक्षण मंत्र्यांनी तातडीने या हल्ल्याच्या निषेध करत थेट प्रतिउत्तर देण्याचा इशारा दिला आहे. आम्हाला जपानी जनतेचे रक्षण करायचे आहे. जर उत्तर कोरियाने या हल्ल्याची पुनरावृत्ती केली तर जपान उत्तर कोरियास जशास तसे उत्तर देईल असा इशाराही जपानने उत्तर कोरियाला दिला त्यामुळे एका बाजूला उत्तर कोरिया तर दुसऱ्या बाजूला दक्षिण कोरिया आणि जपान अशी स्थिती निर्माण झाली आहे मात्र त्यामुळे जगाची चिंता वाढली आहे कारण किम जोंग ऊन हा विक्षिप्त आहे. त्याच्याकडे अण्वस्त्रांचा साठा



आहे जर हा वाद निवळला नाही आणि उद्या युद्धाला तोंड फुटले तर हा विक्षिप्त हुकूमशहा अण्वस्त्रांचा वापर करण्यासही मागे पुढे पाहणार नाही. उत्तर कोरिया हे पूर्वीपासून आक्रमक राष्ट्र म्हणून ओळखले जाते. १९७० च्या दशकात उत्तर कोरियाने रशियाला आण्विक सामर्थ्य निर्माण करण्यासाठी मदत करण्याची विनंती केली मात्र रशियाने ती नाकारली. मात्र दक्षिण कोरिया अमेरिकेच्या जवळ गेल्याने रशियाने उत्तर कोरियाला मदत करण्याचे ठरवले आणि १९७८ ते १९९१ या काळात हळूहळू उत्तर कोरियाला आण्विक सामर्थ्य वाढवण्यास मदत केली या काळात चीननेही उत्तर कोरियाच्या आण्विक महत्वाकांक्षेला खतपाणी घातले त्यामुळे उत्तर कोरिया हे आज अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. उत्तर कोरिया अण्वस्त्र राष्ट्र बनल्याने जपान आणि उत्तर कोरियाची डोकेदुखी मात्र वाढली. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील संघर्ष नवा नाही. आजवर उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर सात वेळा हल्ले केले मात्र अमेरिका दक्षिण कोरियाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया या संघर्षात जपान सारखा शांतताप्रिय देश मात्र विनाकारण खेचला जात आहे. जपान हा दक्षिण कोरियाचा मित्र देश असल्याने उत्तर कोरिया जपानला देखील आपला शत्रू मानत आहे त्यामुळे उत्तर कोरिया दक्षिण कोरिया प्रमाणे जपानवर देखील क्षेपणास्त्रे डागत आहे. ही परिस्थिती जर अशीच कायम राहिली तर स्वतःचे सार्वभौमत्व टिकवण्यासाठी जपान देखील दोन्ही कोरियाच्या संघर्षात उडी घेईल तेंव्हा मात्र परिस्थिती हाताच्या बाहेर जाईल त्यामुळेच हा संघर्ष आणखी वाढू नये यासाठी संयुक्त राष्ट्र संघासह जगातील सर्वच देशांनी पुढाकार घ्यावा. युद्ध कोणत्याही देशाला परवडत नाही युद्धात होत्याचे नव्हते होते. युद्धाची सर्वाधिक झळ सर्वसामान्य जनतेला बसते मात्र किम जोंग ऊन सारख्या विक्षिप्त हुकूमशाला त्याचे काही देणे घेणे त्यामुळेच तो असा आततायीपणा करतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राज्यपालपद 'गुळाचा गणपती' नव्हे !



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**देशात व महाराष्ट्रात २६ नोव्हेंबर हा संविधान म्हणून साजरा केला. या निमित्ताने संविधानाची शपथ घेतली. घटनेव्दारे स्थापन झालेल्या संस्था व घटनात्मकपदावर असलेला व्यक्तीला प्रतिष्ठा व मान असतो. पण राजकीय स्वार्थापायी या घटनात्मक संस्था, व्यक्तींचा अनादर केला जातो, त्यांच्या कार्यपध्दीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. पण घटनात्मक संस्था तुमच्या टिकेला उत्तर देत नाहीत, ते हे घाव सहन करतात. कारण त्या घटनेने शपथ घेतली असती, त्यामुळे ते मर्यादा पाळतात, मौन पाळतात. पण आपण मात्र खुलेआम या घटनात्मक संस्थेचे खिल्ली उडवितो, त्या व्यक्तीचा अवमान करत असतो, हे लक्षात येत नाही.**

महाराष्ट्रातील राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केलेल्या कथित छ. शिवाजी महाराजांच्या केलेल्या विधानावर राजकीय नेत्यांनी त्यांच्या विरोधात टीकेची झोड उठवलेली आहे.यातून कोश्यारींना राज्यपाल- पदावरून हटविण्याची मागणी केली जात आहे.यातही 'राजकारण' दडलेले आहे.कारण हा विरोध कोश्यारींचा नाही.तो मोदी व शहांचा विरोधी आहे.म्हणजे 'कही पे नागाहे,कही पे निशाना' असेच आहे.यातून आपण घटनात्मकपदाची व महाराष्ट्राची बदनामी करत आहोत,याची त्यांना भान नाही.कोश्यारी हे राहतील किंवा जातील पण घटनात्मकपद राहणार आहे ना!त्याचा तरी आदर व सन्मान करा! काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस, ठाकरे शिवसेनेची राज्यपाल विरोधी भूमिका आहे.या विरोधात मनसे व भाजपाचा मित्र पक्ष शिंदे गटाने सूर मिसळला आहे.सेनेचे उध्दव ठाकरे यांनी तर राज्यपालांना वृध्दाश्रमात पाठवावे,असेच म्हंटले आहे.यात 'वाचाळवीर' अमोल मिटकरी, संजय राऊत यांनी राज्यपाल हे भाजपा, आर. एस. एस. चे एजंट आहेत असे म्हणाले.या दोघांच्या तर जीभेला हाड नाही,ते वाटेल तसे बोलत असतात. घटनात्मक संस्थेवर टीका करता मर्यादा पाळली पाहिजे,या सभ्यपणा त्यांच्या अंगी नाही. पण यावेळी नेते शरद पवारांनी बोलतांना काळजी घेतलेली दिसतेय.

देशात राज्य सरकारे व राज्यपाल यांच्यातील संघर्ष व वाद हा नवीन नाही. काँग्रेस राजवटीत संघर्षाच्या अनेक घटना आहेत.पश्चिम बंगाल मध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व तत्कालिन राज्यपाल धनकड यांच्यात वाद टोकाला गेला.तेथील राज्यपालांचा अवमान इतर राज्यात झालेला नसावा.या राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली असतानाही मोदी सरकारला राज्यपालांची शिफारशीव्दारे सरकारला बॅनर्जीचे बरखास्त करण्याचा निर्णय घेता आला असता.पण मोदी सरकारने तसा निर्णय घेतलेला नाही. बाँम्बे प्रांताचे( बाँम्बे प्रसिडेन्सी ) १९४३ पहिले गव्हर्नर द.राईट जॉन काँलव्हिस,होते त्यांचेसह पाच प्रमख होते. तर १९६० महाराष्ट्राचे पहिले राज्यपाल श्री.प्रकाश होते.तरण विजयालक्ष्मी पंडित ह्या पहिल्या महिल राज्यपाल आहेत. भगतसिंह कोश्यारी हे राज्याचे २३ वे राज्यपाल आहेत. काँग्रेसने राज्यपालपदावर राजकीय नेत्यांची नियुक्ती करण्याची परंपरा सुरु केली.तेंव्हा कोश्यारीला झोडण्यापेक्षा.या राज्यपालपदावर राजकीय व्यक्तीची नियुक्ती करण्याची पध्दतच बंद केली पाहिजे, अशी मागणी का केली जात नाही.काँग्रेस सरकारने नेत्याचे पुनर्रवसन करण्याच्या उद्देशाने राज्यपालपदी नियुक्ती करण्याची पध्दत सुरु केली.यात विजयालक्ष्मी पंडित, शिवराज पाटील,मार्गारट अलवा,सुशीलकुमार शिंदे,प्रतिभाताई पाटील अशी यादी मोठी आहे. भाजपाने पण काँग्रेसचा कित्ता गिरविला आहे.पक्षाने बंडारू दत्तात्रय,लालजी टंडन,बनवारीलाल पुरोहित, आनंदीबेन पटेल,नजमा होपतुल्ला,आता कोश्यारी हे भाजपाचे आहेत. तेंव्हा चुकीचा पध्दत कोणी सुरु केली आणि का?यावर विरोधी पक्ष बोलणार नाही.कारण यातून त्यांचे पतळे उघडे पडले असते! याबाबत इतर पक्ष काँग्रेस पक्षाच्या नावाने मात्र खडे कोणी फोडत नाहीत? स्वातंत्र्यानंतर घटना समितीमध्ये राज्यपालांची नियुक्ती,अधिकार, मुदत यावर सविस्तर चर्चा झाली.त्यानंतर ३१ मे १९४९ मध्ये घटनेतमध्ये राज्यपालपदाच्या विषयी कलमांना स्विकृती देण्यात आली. तत्कालिन पंतप्रधान नेहरू यांनी राज्यपालांची निवड निवडणुकीव्दारे नको, तर नियुक्तीव्दारे करावी,अशी भूमिका मांडली.या पदासाठी निवडणूक झाल्यास राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यात संघर्ष होऊ शकतो.तसेच या पदासाठी निवडणूक खर्चही आयोग्य ठरतो,असे म्हणाले.तसेच देशातील फुटीरवादी वृत्तीला रोखण्यासाठी राज्यपालावर केंद्राचे नियंत्रण असले पाहिजे,तेंव्हा राष्ट्रपतीमार्फत राज्यपालची नियुक्त केली जावी,असा आग्रह नेहरू यांनी केलेला आहे.त्यानंतर देशात घटनेतील १५५ नुसार राष्ट्रपती हे राज्यपालांची नियुक्ती करत आहेत.राज्यपाल हे घटनात्मक पद आहे.राष्ट्रपतीप्रमाणे हे पद मानाचे व प्रतिष्ठेचे पद आहे.या पदासाठी व्यक्ती भारतीय असावी व वयोमर्यादा ही ३५ असावे या दोनच अटी आहेत. राज्यपालांना वेतन दि. १ फेब्रुवारी १८ नुसार ३ लाख ५० हजार रूपये, भत्ते स्वंतत्र आहेत.या पदावर आजपर्यत काँग्रेसने सर्वाधिक राजकीय व्यक्तींची निवड केली आहे.त्याला अपवाद असेल.घटनेनुसार राज्यपालांना कार्यकारी अधिकार, कायदेविषयक अधिकार, न्यायिक अधिकार,अर्ध विषयक



अधिकार आहेत.हे पद केवळ शोभेचे नाही, अथवा 'गुळाचा गणपती' नाही.सर्वोच्च न्यायालयाने १९७९ मध्ये राज्यपाल हे केंद्र शासनाच्या आधीन असले तरी ते स्वतंत्र घटनात्मकपद आहे व केंद्रांच्या नियंत्रणाखाली कार्य करत नाही.ते केंद्र शासनाच्या आधीन असलेले वेतनदार कर्मचारी नाहीत'असे म्हंटले आहे. घटनेने राज्यपालांना स्वविवेकाधिकार देण्यात आलेले आहेत. तेंव्हा घटनेच्या कलम १६१(१) नुसार राज्यपालांना राज्य मंत्रिमडळाचा प्रत्येक सल्ला बंधनकारक नाही.म्हणून तर महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या काळात १२ आमदारांच्या नियुक्तीचा प्रश्न रेंगाळत पडला.महाविकास आघाडीचे नेते न्यायालयात गेले होते,न्यायालयाने ते घटनात्मकपद असल्याने याबाबत निर्देश देण्यास नकार दिला.तेंव्हा नेते तोंडावर आपटले. यावरून ठाकरे व सेनेचे राऊत यांचा कोश्यारीवर राग आहे. कोश्यारी हुशार! त्यांनी मग बारा आमदारांचा नियुक्तीचा प्रस्ताव शुक्राचार्याप्रमाणे अडवून ठेवला!.यामुळेच राजभवन भाजपाचा अड्डा बनला आहे,लोकशाही गळा घोटला जात आहे,असा रोज ओरड सुरू आहे.या प्रत्येक वेळी "महाराष्ट्राची बदनामी'चा सूर निघत असतो.हे नेते व त्यांचा पक्ष म्हणजे महाराष्ट्र आहे काय? या नेत्यांनी राज्यपालांना लक्ष्य करत गेले त्यातून वाद वाढत गेला.नेमके राज्यपालांच्या विधानाचा फायदा या नेत्यांनी उचलला व हल्ला सुरु केला.कोश्यारींनी शिवरायांचा केला,असा आरोप केला? कोश्यारी हे शिवरायांचे व्देषी आहेत काय? अवमान करण्यामागे हेतू आहे काय?,असा हेतू यात मुळीच दिसत नाही. केवळ भाषणातील शब्दांचा खेळ,भावनिक आधार घेवून अवमान राजकीय भांडवल केल जात आहे.यातून शिवरायांची महानता मुळीच कमी होणारी नाही.असो. राज्यपालपदाच्या घटनेतील अधिकाराची माहिती नाही,तसेच काँग्रेस राजवटीतील राज्यपालांनी वादग्रस्त निर्णय घेतलेले व राजकीय वापर केला,याचा इतिहास पत्रकार,व नेते राऊत यांना माहित नसावे काय?घटनेत कलम ३६५ अंर्तगत राष्ट्रपती राजवटी बाबत शिफारस करताना राज्याच्या मुख्यमंत्र्याचे मत,सल्ला घेण्याची गरज नाही.राज्यपालांची नियुक्ती, बदली ,राजीनामा घेणे,हटविणे, हे अधिकार राष्ट्रपतींना आहेत. हे राष्ट्रपतीचे अधिकार असले पण 'लगाम" केंद्र सरकारच्या हातात आहे. केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना राज्यपालपदी राजकीय व्यक्तींची नियुक्ती केली.तीच राजकीय प्रथा आजही चालू आहे. मग आता भाजपा सरकार या पदावर पक्षाच्या व्यक्तींची नियुक्ती करत असेल तर काय चुकले?असे भाजपा म्हणणारच! मग काँग्रेस व भाजपाच्या कार्यपध्दीत संस्कारात फरक तरी काय? काँग्रेस सरकारने केलेल्या चूका व प्रथा सुरु केल्या म्हणून भाजपा सरकार करणार आहे का?भाजपाने तर कालबाह्य कायदे,चुकीच्या परंपरा बंद करण्याचे पाऊल उचलेले पाहिजे.. यासाठी भाजपा सरकारला घटनेत,नियमात सुधारणा करावी लागेल.पण केवळ कोश्यारीला हटविल्याने हा प्रश्न सुटणार आहे का? भाजपा दूसरा नेता येईल!तोही तेच करेल! मग तोच गोंधळ,आरोप करत बसणार आहात का? तेंव्हा राज्यपालपदाच्या निवडीत पध्दतीत सुधारणा करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली पाहिजे.पंतप्रधान मोदी व गृहमत्री शहा हे या विषयावर निर्णय घेवू शकतीत! पण त्यांनाही प्रथम पक्ष पातळीवर या विषयाला संमती मिळवावी लागेल.भाजपाचे ज्येष्ठ नेते अडवाणी यांनी राज्यपालपद अराजकीय असावे,अशी मागणी केली होती. भाजपा काँग्रेस राजवटीत राज्यपालांच्या कार्यपध्दीवर टीका होत आलेली आहे. राज्यपालपद 'हे केंद्राचे बाहूले' असे म्हंटले गेले जात होते मग आज भाजपा सरकार या विषयावर गप्प का? याबाबत सरकारिया आयोगाने राज्यपालापदाबाबत आचारसहिंता सूचित केली आहे.यात राज्यपाल व्यक्ती हे घटक राज्याबाहेरचे असावेत.राज्यपालपदावर राजकीय व्यक्ती नियुक्त करू नये. त्यांची पदाची मुदत पाच वर्षे असावी.त्यांना पदावरून दूर करताना एक समिती नियुक्त केली जावी,त्यात उपराष्ट्रपती,आणि लोकसभेचे सभापती,निवृत्त न्यायाधीश असावेत.राज्यपालपद भोगलेल्या त्या व्यक्तीला सक्रिय राजकारणात बंदी असावी,अश्या सूचना केल्या आहेत. देशातील विरोधी भाजपा सरकारकडे याबाबतच्या प्रस्तावासाठी दबाब का आणत नाही?केवळ शिमगा प्रश्न सुटत नाही. लोकशाहीत सुधारणा कराव्या लागतात.तर प्रश्न सुटतात.

घटना समितीच्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, राज्यघटना चांगल्या लोकांच्या हातात गेली तर सोन होईल,पण चुकीच्या व्यक्तीच्या हातात गेली, तर राज्य घटनेला रद्दी होईल व माती होईल'तेंव्हा काँग्रेस पक्षाने १९५२ पासून राज्यपालाचा राजकीय वापर सुरू केला.काँग्रेसचे तत्कालिन अर्थमंत्री पी.चिंदम्बरम भाजपा विरोधात भाजपा विरोधी लेख राज्यातील 'बडे' दैनिक प्रकाशित करत असते.यात त्यांनी राज्यपाल हे मुख्यमंत्र्यावर वर्चस्व गाजवितात,कारण त्यांना मुख्यमंत्री व्हायचे असते,असा जावाई शोध लावलेला आहे? पण असे देशातील एकही उदाहरण त्यांनी लेखात दिलेले नाही.तरेच राज्यपाल असे का वागतात? यावर रिझर्व बँकेचे गव्हर्नर व माजी राज्यपाल यांच्या 'फोर्स्क इन द रोड' या पुस्तकाचा आधार घेतला.या पुस्तकावरून त्यांना राज्यपालाची नियुक्ती राजकीय कारणातून होतअसल्याचे ज्ञान आता प्राप्त झाले आहे.काँग्रेस सरकारने राज्यपालाचा राजकारणासाठी वापर केला,हे अनुभवी,ज्ञानी ज्येष्ठ नेत्यांना माहित नाही काय? पण ते लिहिणे सोयीस्करपणे टाळतात.चिंदम्बरम'यांचे भाजपा विरोधातील पॅड लेख आहे,की काय ?अशी शंका येते.कारण हे 'बडे दैनिक' सतत लेख प्रकाशित करते आहे.काँग्रेस काळातील राज्यपालाच्या वादग्रस्त प्रकरणे गाजली आहेत.देशात १३१ वेळा राष्ट्रपती राजपती राजवट लागू केलेली आहे.प्रथम २० जून १९५१ मध्ये पंजाब मध्ये राष्ट्रपती राजवटीचा वापर केला. महाराष्ट्रात तीन वेळा १९८०, २०१४, २०१९' राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.काँग्रेस सरकारने राज्यपालांना वापर विरोधी पक्षांचे सरकारे बरखास्त करण्यासाठी केला होता,हे विस्मरण होत आहे.यात राज्यपालांची निर्णय सर्वोच्च न्यायालयाने असवैधानिक ठरविले आहेत.अध्याय पहिला- आंध्रप्रदेशचे १९८३-८४ ला रामलाल ठाकूर राज्यपाल होते.मुख्यमंत्री एन.टी रामाराव र्हदयाच्या शस्त्रक्रिये- साठी अमरिकेत गेले असताना राज्यपालांनी त्यांचे सरकार बरखास्त केले,वअ र्थमंत्री भास्कररावांना मुख्यमंत्रपदाची शपथ दिली.रामाराव परत आले, त्यांनी राज्यपालांच्या विरोधात आघाडी उघडली.त्यांनी समर्थक आमदारांची दिल्लीतच परेड घेतली.रामारावांच्या आक्रमक दवाबानंतर केंद्राने तो राज्यपाल बदलला.नवीन राज्यपाल आले व रामाराम पुन्हा मुख्यमंत्री केले.अध्याय दुसरा- कर्नाटकमध्ये १९८३ जनता पार्टीचे हेगडे यांनी राजीनामा दिल्यानंतर बोम्मई हे मुख्यमंत्री झाले.पण राज्यपाल पी.वैंकटसुब्बय्या यांनी सरकार बरखास्त करून टाकले.यात राज्यपालाच्या निर्णय सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांचा असंवैधानिक ठरविला व तेंव्हा विधानसभागृहात बहुमताचा निर्णय घेतला जावा,असा निर्णय दिला गेला.त्यामुळे बोम्मई पुन्हा मुख्यमंत्री झाले.या निकालाचा हवाला आजही दिले जात असतो.अध्याय तिसरा- हरियाणाचे १९८० मध्ये देवीलाल मुख्यमंत्री होते.राज्यपाल गणपतराव तापसे यांनी आमदारांना वळून भजनलाल यांना सत्तेवर बसविले. यातून दोघात संघर्ष झाला.पण शेवटी भजनलाल यांचे बहूमत सिध्द केले. अध्याय चौथा- उत्तरप्रदेशचे १९९८ मध्ये भाजपा मित्रपक्षाचे कल्याणसिंह सरकार राज्यपाल रोमेश भंडारी यांनी बरखास्त केले व जगदंबिका पालांना मुख्यमंत्री केले.उच्च न्यायालयात राज्यपालांचा निर्णय असंवैधानिक ठरविला.नंतर कल्याणसिंह पुन्हा मुख्यमंत्री झाले. पण पाल हे दोन दिवसाचे मुख्यमंत्री ठरले.अध्याय पाचवा- झारखंड मध्ये २००५ मध्ये भाजपा ३० तर शिबू सोरेन यांचे १७ आमदार होते. राज्यपाल सैय्यद सिब्तेजी रजी यांनी सोरेन यांना मुख्यमंत्री केल.पण सोरेन यांना बहूमत सिध्द करता आल नाही,सरकार नऊ दिवसातच कोसळल.अध्याय सहावा- बिहार मध्ये २००५ मध्ये कोणत्याही पक्षाला बहूमत मिळाले नव्हते.राज्यपाल बुटासिंग यांनी मध्यरात्री विधानसभा बरखास्त करून टाकली.बुटासिंग घोडेबाजार थांबविण्यासाठी निर्णय घेतला,असे म्हणणे होते.पण न्यायालयाने येथेही राज्यपालाचा निर्णय असवैधानिक ठरविला.अध्याय सातवा- बिहार १९९८ मध्ये राबडी देवीचे सरकार होते.तेंव्हा राज्यपाल व्ही.सी पांडे यांनी पाठविला तेंव्हा राष्ट्रपती राजवट लागू केली.राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर झाला राज्यसभेत झाला नाही. तेंव्हा राबडीदेवी मुख्यंमंत्रीपदावर बसल्या.तेंव्हा केंद्रात भाजपाचे व वाजपेयीचे सरकार होते.केंद्रात सत्ता पालट झाला की,राज्यपालांना बदल्याचे अलिखित संकेत दिसून येतात. केंद्रात मोदी सरकारने२०१४ मध्ये अनेक राज्यपालांनापदावरून काढले. महाराष्ट्रात तत्कालिन राज्यपाल के.शंकरनारायण यांचेवर राजीनामा देण्यासाठी दवाब आणला गेला,हे राज्यापालांनी पत्रकार परिषदेत केला होता.यात २०१४ अरूणाचल प्रदेशमधील घटना धक्कादायक आहे.या राज्यात काँग्रेसला बहूमत मिळालेल होत.काँग्रेसचे नवाब तुकी हे मुख्यमंत्री तर अरूणाचल पीपल्स पार्टीचे नबाब रेबीया हे विधानसभेचे अध्यक्ष होते. मुख्यमंत्री तुकी यांनी पक्षातील नेते कलिखो पुल यांना मंत्रिमंडळातून काढले.यातून तुकी व पुल यांच्या वाद टोकाला गेला.यात मुख्यमंत्र्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले काँग्रेसमधील २१ आमदारांनी बंडखोरी केली. दरम्यान भाजपा सरकारने राज्यपाल म्हणून ज्योतीप्रसाद राजखोवा यांची नियुक्ती केली.विधानसभेत बंडखोर आमदारांना निलंबित केले गेले.पुल यांनी बंडखोर आमदारांची बैठक घेतली.विधानसभा अध्यक्ष रेबीया पदावर हटविल गेले व नवीन अध्यक्ष निवडला. त्यानंतर एका अलिशान हॉटेलात अधिवेशन घेण्यात आले.यात मुख्यमंत्री तुकी.च्या विरोधात अविश्वास प्रस्ताव संमत करण्यात आला.रेबीया न्यायालयात गेले. न्यायालयाने विधानसभा कामकाज बंद ठेवण्याचा आदेश दिला. त्यानंतर केंद्राने राष्ट्रपती राजवट लागू केली.नंतर काँग्रेसची राज्यपालांना मुख्यमंत्र्यांना शपथ देण्याची स्थगितीची मागणी न्यायालयाने फेटाळली. यामुळे सरकार स्थापनेचा मार्ग खुला झाला.सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालाचा निर्णय राखून ठेवला.केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट मागे घेतली.त्यावेळी पुल यांना भाजपाच्या आमदारांनी समर्थन दिले,तुकी हे पुन्हा मुख्यमंत्री झाले.पण शेवटी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने सरकार बरखास्त करणे,राष्ट्रपती राजवट लागू करणे,भाजपा मदतीने सरकार स्थापनेचा राज्यपालाचा निर्णय रद्दबादल ठरविला.यात राज्यपालांनी घटनेच्या १६३, १७४,१७५ या कलमांचे उल्लंघन केल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.तेंव्हा राज्यपाल राजखोवा यांनी पदाचा राजीनामा देण्यास नकार दिला,शेवटी राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांना त्यांना पदावरून काढले.पण राजकारणासाठी आपला वापर केला गेला, असा आरोप ठेवला बंडखोर मुख्यमंत्री कलिखो पुल यांनी गळफास घेवून आत्महत्या केली.या घटनेला काँग्रेस बरोबर भाजपा तितकाच जबाबदार आहे. महाराष्ट्रात असेच राजकीय नाट्य घडलेले आहे.पण मुख्यमंत्र्यांनी स्वतः राजीनामा दिला,तसेच शिंदे पक्षांतर केलेले नाही, हा पक्षांतर्गत वाद आहे,पक्षाने बंडखोर आमदारांना म्हणून निलंबित केले नाही तसेच अपात्रेचा निर्णय घेतला नाही.त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय घडामोडीत अतिशय गुंतागुंत झालेली आहे. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिंदे सरकारचे भवितव्य आहे.तसेच २०१७ गोवा,कर्नाटक मध्ये २०१८ मध्ये सत्ता स्थापनेच्या राज्यपालांच्या निर्णयावर आक्षेप घेतला गेला होता.यातून ःभाजपा सरकारवर टीका झाली.आता महाराष्ट्रात राज्यपाल कोश्यारींच्या कार्यपध्दतीवर सतत टिका होत आहे. पण त्यापेक्षा त्यांच्या राजकीय नेत्याप्रमाणे बोलण्याच्या सवयीमुळे देशात राज्यपालपदाची प्रतिमा मलिन होत आहे,याला राष्ट्रपतींनी आवर घालू शकतात.भाजपाने कोश्यारींनापदावरून हटविणे योग्यच राहील.राज्यात घडलेल्या घटनावरून कोश्यारी यांची पदावरून गच्छंती अटळ आहे,पण केंद्रातील भाजपा सरकार लगेच निर्णय घेणार नाही, महाराष्ट्रातील राजकीय गोंधळ,वातावरण थंड झाल्यानंतर राज्यपालांना हटविले जाईल. असे दिसतेय!

# ज्वारीच्या भाकरीचे महत्व

"मी आहारातून गहू काढून टाकला आणि माझं वजन १४ किलोनी कमी झालं."
"माझा दमा इतका बरा झाला की, मी माझे दोन इन्हेलर्स काढून फेकून दिले."
"गेली २० वर्षं अर्धशिशीमुळे माझं डोकं जे रोज दुखायचं, ते तीन दिवसांत दुखायचं बंद झालं."
"माझ्या छातीतली जळजळ आता थांबली."
"माझा इरिटेबल बाउल सिंड्रोम सुधारला, माझा अल्सरेटिव्ह कोलायटिस, माझा रुमटॉइड आर्थ्रायटिस, माझा मूड, माझी झोप" वगैरे सुधारले... गव्हामुळे तुमच्या रक्तातली साखर अत्यंत नाटकीय पद्धतीने वाढते. काही विदेशी संस्कृतींमधले लोक जे गहू खात नाहीत ते यामुळेच अधिक सडपातळ आणि निरोगी असतात.

जेवणात का खावी ज्वारीची भाकरी ?
ज्वारीमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने शरीरास पटकन ऊर्जा मिळते. कमी खाऊनही पोट भरल्याची जाणीव होते. ज्वारीमध्ये असणाऱ्या अमायनो ॲसिड्समधून शरीरास मुबलक प्रोटीन्स मिळतात. तसेच फायबर्स असल्याने अन्नाचे सहज पचन होते. बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाण्याची सवय लावून घ्यावी. त्यामुळे मूळव्याधीचा त्रास होत नाही. तसेच ज्यांना किडनी स्टोनचा त्रास टाळायचा असेल त्यांनी नक्कीच ज्वारीची भाकरी आहारात आणावी. ज्वारीतील पोषणतत्त्वामुळे किडनी स्टोनला दूर ठेवता येते. ज्वारीमध्ये असणाऱ्या निॲसिनमुळे रक्तातील कॉलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. तसेच



ज्वारीमधील फायटो केमिकल्समुळे हृदयरोग टाळता येतात. ज्वारीमधल्या पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि मिनरल्समुळे रक्तदाब (ब्लडप्रेशर) नियंत्रणात राहतो. भाकरीत लोह मोठ्या प्रमाणात असते. ॲनिमियाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाल्ल्यास त्यांना फायदा होतो. लाल पेशींची वाढ होण्यास मदत होते.

ज्वारीचे फायदे :- 1) ज्वारीत असणाऱ्या तंतुमय पदार्थांमुळे पोट साफ राहते. 2) ज्वारी पचनास सुलभ असल्यामुळे आजारी व्यक्तीस दूध भाकरी फायदेशीर ठरते. 3) ज्वारीमुळे पोटाचे विकार कमी होतात. 4) रक्तवाहिन्यांतील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यासाठी ज्वारी उपयुक्त आहे. 5) हृदयासंबंधित आजारात ज्वारी अतिशय उपयोगी आहे. 6) शरीरातील इन्शुलिनची उत्पादकता कायम, योग्य प्रमाणात व कार्यक्षम ठेवण्यास मधुमेह असणाऱ्यास, तसेच इतरांनाही ज्वारीचा वापर उपयुक्त ठरतो. 7) शरीरातील अतिरिक्त चरबी, वजन कमी करण्यासाठी, कातडीचे आजार, जठरातील आम्लता कमी करण्यास उपयोगी. 8) महिलांच्या गर्भाशयाचे आजार, प्रजोत्पादन संस्थेचे विकार असणाऱ्यांना ज्वारी उपयोगाची आहे. 9) ज्वारीत काही घटक कर्करोगावर नियंत्रण आणतात. 10) शौचास साफ होण्यासाठी ज्वारी अतिशय उपयोगी आहे. 11) काविळीच्या आजारात पचायला हलक्या अन्नाची आवश्यकता असते. त्यामुळे काविळीच्या आजारामध्ये व नंतर वर्षभर ज्वारीच्या भाकरीचे नियमित सेवन केल्यास फायदेशीर ठरते. ज्वारीला दररोजच्या आहारात प्राधान्य द्या आणि गव्हाचा सणावाराला उपयोग करा.

# शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे समाजसुधारक

आधुनिक केसरी

**विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।। बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा जोतिबांनी निश्चय केला. इ.स. १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत असणाऱ्या भिडे वाड्यात मुलींची पहिली मराठी शाळा जोतिबांनी स्थापन केली. या शाळेतील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यावर सोपविली. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.**

**सत्यशोधक समाजाची स्थापना :**
२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरवात केली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. त्याचवेळी त्या कन्याशाळेच्या शिक्षिका म्हणूनही कार्य करीत होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन प्रकाशनचे कार्य केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत चळवळ पोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. तथाकथित उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या अन्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥ हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली आणि मराठीत मंगलाष्टके रचली. जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून , गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. `निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी' हा विचार फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक हा शब्द वापरला, त्यावरून सत्यशोधक समाज व अर्थातच महात्मा ज्योतीबा फुले आस्तिक होते, हे स्पष्ट होते. महात्मा फुले यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहून झाल्यानंतर महाराष्ट्रात पंतोजी व शेटजींच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला ज्योतिबा फुले हे क्रांतिकारी नेते असल्याने त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान व व्यासपीठ निर्माण करणे त्यांना अत्यंत गरजेची वाटली यातूनच सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान मानताना एकेश्वरवाद ईश्वर भक्ती व्यक्ती चे श्रेष्ठत्व त्याचप्रमाणे ग्रंथप्रामाण्य त्याला विरोध सत्य हेच परम मानवी सद्गुणांची जोपासना अशाप्रकारे वैचारिक आणि प्राथमिक भूमिका घेऊन सत्यशोधक समाजाने आपले तत्वज्ञान मांडले ईश्वराची भक्ती ही निरपेक्ष भावनेने असावी त्यामध्ये मध्यस्थाची अथवा बट भिक्षू ची आवश्यकता नाही याचं प्रतिपादन सत्यशोधक समाजाने केलं त्याचप्रमाणे व्यक्ती ही जन्माने श्रेष्ठ नसून ती गुणकर्माने श्रेष्ठ ठरते याचं स्पष्टीकरणही सत्यशोधक समाजाने दिलं पाप-पुण्य स्वर्ग-नरक पुनर्जन्म या गोष्टीला त्यांनी थारा दिला नाही तर सत्य हेच परब्रम्ह आहे अशा प्रकारचा विचार सत्यशोधक समाजाने मांडला मानवाच्या अंगी असलेल्या सद्गुणांची जोपासना व्हावी हा विचार दृढ करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.
सत्यशोधक समाजाचे मुंबई शाखेचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे हे होते.इ.स 1890



मध्ये यांनी दिनबंधु या वृत्तपत्राचे संपादन आणि मुद्रण मुंबई येथून केले. सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रस्तूत केले आहे मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित उपेक्षीत समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात असे.या वृत्तपत्राचे संपादक 'कृष्णराव भालेराव हे होते,त्यांनी इ.स 1 जानेवारी 1877 मध्ये पुणे येथे स्थापन केले होते, या वृत्तपत्र मराठी भाषेत होते .लोकशिक्षण व लोकजागृती प्रभावी माध्यम म्हणून दिनबंधुचा उल्लेख करावा लागतो.
**'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥'**
हे या समाजाचे घोषवाक्य होते.
सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी महात्मा फुले यांनी घटना बनविली. तद्नुषंगाने नियमावली तयार केली.मूलतः सत्यशोधक समाज एकच निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या गंथात दिली असून, त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यांनुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरुवातीस महात्मा जोतीराव फुले हे चिटणीस आणि डॉ. विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे होती. सुरुवातीस दर रविवारी डॉ. गावडे यांच्याकडे अनौपचारिक रीत्या मंडळी जमत. समाजापुढील प्रश्न, सोडवणुकीचे उपाय व सदयःस्थिती यांविषयी चर्चा होत आणि दर पंधरा दिवसांतून एक व्याख्यान असा उपक्रम असे. सत्यशोधक समाजातील व्यक्तींनी पुढील काही सूत्रे काटेकोरपणे पाळावीत, अशी भूमिका आहे. (१) ईश्वर (निर्मिक) एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मिकाशिवाय (निर्मात्याशिवाय) मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. (२) निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. (३) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून गुणांनी श्रेष्ठ ठरतो. (४) निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही. (५) पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत त्यांचा अवलंब माझ्याकडून होणार नाही. (६) जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. (७) दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचा मी प्रयत्न करीन आणि (८) तसेच समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माझ्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन. **बालपण आणि शिक्षण :** महात्मा ज्योतीबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी महात्मा फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, **क्रमशः**

संशोधक विद्यार्थी
**भारत आसाराम बल्हाळ**
एम. ए. मराठी, पीएच. डी. अपीयर
(रिसर्च सेंटर – अंकुशराव टोपे कॉलेज जालना)

# धर्मांतरविरोधात देशव्यापी कायदा करण्याची गरज!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306


आधुनिक केसरी

**सध्या देशात सक्तीने धर्मांतर करून घेण्याचे प्रकार वाढल्याने देशव्यापी धर्मांतर कायदा करण्याची गरज आहे. देशभरात धर्मांतर करण्यासाठी अंधश्रद्धा, छळ, लालूच दाखवून किंवा इतर मार्गांचा अवलंब करून सक्ती केली जात आहे. धर्मांतरासाठी प्रामुख्याने समाजातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना लक्ष केले जाते. सक्तीने केल्या जाणाऱ्या धर्मांतरा विरोधात उत्तर प्रदेश,कर्नाटकसह काही राज्यांनी सक्तीच्या धर्मांतर विरोधी कायदा केला आहे. परंतु या गंभीर समस्ये विरोधात देशव्यापी कायदा केला जाण्याची गरज आहे.**

धर्मांतराला आळा घालण्यासाठी देशातील ९ राज्यांनी गेल्या काही वर्षांत कायदे केले आहेत.भारतातील ओडिशा,म प्रदेश,गुजरात, छतीसगड,झारखंड, उत्तरप्रदेश, कर्नाटक आणि हरियाणा ही अशी राज्ये आहेत जिथे धर्मविरोधी कायदे आधी पासूनच आहे. हिंदूंच्या सहिष्णू असण्याचा गैरफायदा घेत बऱ्याचदा फसवणूक, लालूच किंवा लव्ह जिहाद सारख्या गोष्टींचा वापर वापर करून सक्तीचे धर्मांतर केले जाते. १९४७ साली धर्माच्या आधारावर देशाचे दोन तुकडे पाडण्यात आले. त्यामुळे धर्मांतरा पाठीमागे देशविघात शक्तींचे देशाचे तुकडे पडण्याचे इरादे असल्याचे बऱ्याचदा उघड झाले आहे. भारतीय संविधानाने धर्म निवडीचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकास बहाल केले आहे. परंतु ते करत असताना आपण एखाद्यावर दबाव टाकू शकत नाही. इतरांचे स्वतंत्र्य धोक्यात येईल, अशा कोणत्याही कृतीला राज्य घटना मान्यता देत नाही. त्यामुळे देशभरातून धर्मांतर विरोधी कायदा तयार केला जावा, अशी मागणी केली जात आहे. **सर्वोच्च न्यायालयाने नेमके कोणते निर्देश दिले :** देशव्यापी सक्तीच्या धर्मांतर विरोधी कायदा अमलात यावा यासाठी ॲडव्होकेट अश्विनी उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्याची दखल घेत, न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती कृष्णा मुरारी यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, गृह मंत्रालय आणि कायदा व न्याय मंत्रालयाला नोटीस बजावण्याचे आदेश दिले. १४ नोव्हेंबरपर्यंत सर्व पक्षांकडून उत्तर मागवण्यात आले आहे. सदर याचिकेत धमकावून, जबरदस्ती किंवा फसवणूक, भेटवस्तू किंवा आमिष दाखवून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी कठोर कायदे करण्याचे निर्देश केंद्र आणि राज्य सरकारांना द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे. उपाध्याय म्हणाले की, सक्तीचे धर्मांतर ही देशव्यापी समस्या आहे, त्यामुळे त्यावर तातडीने नियंत्रण आणण्याची गरज आहे. अश्विनी उपाध्याय यांनी आपल्या याचिकेत काय म्हंटले : अश्विनी उपाध्याय यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत असे म्हटले आहे की, देशात असा एकही जिल्हा नाही जिथे सक्तीचे धर्मांतर केले जात नाही. देशभरात दर आठवड्याला अशा घटना घडतात की ज्यात धमकावून, भेटवस्तू आणि पैशाच्या लालसेने किंवा फसवणूक करून आणि काळी जादू, अंधश्रद्धा, खोटे चमत्कार दाखवून धर्मांतर केले जाते. हा धोका रोखण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी ठोस पावले उचलणे गरजेची आहेत. **तामिळनाडूतील लावण्य आत्महत्या प्रकरण :** याचिकाकर्त्या अश्विनी उपाध्याय यांनी तमिळनाडूच्या लावण्य हिने धर्मांतराच्या दबावाखाली आत्महत्या केलेल्या प्रकरणासह इतर अनेक घटनांचा दाखला दिला. याचिकेत भारतीय कायदा आयोगाला या संदर्भात अहवाल तयार करण्यासाठी तसेच धमकावून आणि आर्थिक लाभाच्या माध्यमातून धर्मांतरावर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे तयार करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे.



# श्री क्षेत्र माहूर गड



आधुनिक केसरी

मराठवाड्यातील नांदेड जिल्हा, किनवट तालुका येथील माहुरगडावर श्रीदत्तात्रेय, श्रीरेणुका, अनसूया इत्यादींचा निवास असल्याने दत्तभक्तांना माहूरची ओढ नेहमीच असते. माहूरगड हा सह्याद्रीचा भाग असून येथे दत्तात्रेय निद्रेसाठी येतात असा समज आहे. स्कंदपुराणातील सह्याद्रिखंडात रेणुकामाहात्म्य आणि कालिकाखंडात आमली (माहूर)- माहात्म्य अशा दोन कथा आल्या आहेत. ब्रह्मदेवास सृष्टीची रचना करण्यास सोयीचे व्हावे म्हणून विष्णूंनी एक नमुना म्हणून सृष्टीच्या अगोदर हे क्षेत्र सात कोस लांब व सात कोस रुंद अशा विस्तृत प्रमाणावर निर्माण केले. या क्षेत्राला चार दरवाजे आहेत. १) पूर्वेकडील हाटकेश्वर असून येथे बंजरा नदीवर धबधबा आहे. २) दक्षिणेस पैनगंगेच्या काठी फुलसावंगी गावाजवळ एका टेकडीवर विमलेश्वराचे स्थान आहे. ३) पश्चिमेस इज़नी गावाजवळच्या पहाडात दर्दरेश्वर आहे. ४) उत्तरेकडे सिद्धेश्वर व कापेश्वर अशी स्थाने आहेत. माहूर अथवा मातापूर या क्षेत्राच्या तीनही बाजूंनी पैनगंगा नदी वाहते. नदी ओलांडून गेल्यावर दोनचार मैलांवर पहाडाच्या पायथ्याशी माहुरक्षेत्र हे गाव आहे. रेणुकामाता, दत्तात्रेय व अनसूया यांची शिखरे गावाच्या पार्श्वभूमीस लागून स्वतंत्रपणे आहेत. पैनगंगा नदीसही पौराणिक पार्श्वभूमी आहे. विदर्भातील लोणारक्षेत्रात लवणासुरास विष्णूंनी मारले. म्हणून ब्रह्मदेवाने श्रीविष्णूचे पाय कमंडलूतील पाण्याने धुतले. भगवंताच्या चरणतीर्थातून पावन होणारी जी नदी ती पैनगंगा झाली. हिलाच पुढे प्रणिता अथवा प्राणहिता असे नाव मिळाले. ‘प्रणिता प्रदक्षिणा वाहते । दुजें वैकुंठ महीवतरें’ असा महिमा या क्षेत्राचा विष्णुदासांनी वर्णन केला आहे. आमलीग्राम, सिद्धपूर, देवनगर, मातापूर अशी विविध नावे निरनिराळ्या युगात या क्षेत्रास मिळालेली दिसतात. काशीक्षेत्रापेक्षाही याचे महात्म्य मोठे असल्याने ‘जवा आगळी काशी’ असे माहूरसंबंधाने म्हटले जाते. काशी क्षेत्रास जसा काळभैरव तसा या क्षेत्रास झंपटनाथ हा क्षेत्रपाल कोतवाल आहे. या माहूर क्षेत्रात जगदंबा रेणुका, दत्तात्रेय व देवदेवेश्वर या प्रमुख दैवतांचा वास असल्याने सर्वच भाविकांना याची ओढ नित्य असते. जमदग्नी, रेणुका, परशुराम यांची स्थाने येथेच आहेत. जमदग्नीच्या चितेवर रेणुका सती गेली ती येथेच. दत्तात्रेय या प्रसंगी उपस्थित होते. चितेतून गळ्यापर्यंतच निघालेली रेणुका आज येथील रम्य शिखरावर निवास करून आहे. शिखराच्या पायथ्याशी मोवाळा नावाचा एक तलाव असून त्याला मातृतीर्थ म्हणतात. या तीर्थात स्नान केल्याने सर्व पातकांचा नाश होतो. रेणुकाशिखरापासून तीन मैलांवर दत्तात्रेयांचे शिखर आहे. हे संस्थान गोसावी महंतांच्या ताब्यात होते. तूर्त तेथील व्यवस्था सरकार पाहते.

# अण्णा भाऊंच्या सहकारी कलावंतांसोबत एक दिवस



डॉ. मारोती द. कसाब
संपर्क क्र. 9822616853

आधुनिक केसरी

**पूर्वीच्या बिदर जिल्ह्यातील आणि आताच्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर हा तालुका कम्युनिस्ट विचारांनी प्रभावित झालेला होता. अहमदपूर हा डाव्या चळवळींचा बालेकिल्ला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या आधीपासून या भागातील अनेक लढवय्या वीरांनी स्वातंत्र्यासाठी चळवळ उभी केलेली होती. निजामी राजवटीच्या शेवटच्या काळात आलेल्या रझाकारी हुकूमशाही विरुद्ध या भागातील अनेक बहाद्दरांनी रणशिंग फुंकले होते. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्यासाठी या भागातील अनेक वीरांनी घरादाराचा त्याग करून भूमिगत चळवळ राबविली होती.**

क्रांतिसिंह नाना पाटील हे साताऱ्याहून खास अहमदपूरला येत असत. हैदराबाद स्टेट मधील विरोधी पक्ष नेते कॉ. व्ही.डी. देशपांडे यांचा या शहराशी निकटचा संबंध होता. त्यापूर्वी राष्ट्रसंत गाडगेबाबांची अनेक कीर्तने या भागात झालेली होती.

त्यामुळे हा भाग पुरोगामी चळवळीसाठी नेहमीच पोषक ठरलेला आहे. जातिवाद, भांडवलवाद, सरंजामदारी व्यवस्था अशा प्रकारच्या फॅसिस्ट विचारांचा विरोध या तालुक्यातील जनतेने नेहमीच केला आहे. एकंदरीत हर तऱ्हेच्या अन्यायाविरुद्ध लढण्याचा बाणा हा अहमदपूरकरांचा खास वारसा होय. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या नंतर लगेचच सुरू झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अहमदपूर तालुक्याने मोठे योगदान दिलेले आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांचे वास्तव्य सलग तीन महिने या तालुक्यातील धसवाडी या गावातील शंकरराव कांबळे, सोपानराव कांबळे यांच्या वाड्यात होते. कम्युनिस्ट पक्षाने या तालुक्यातील अनेक गावात आपले प्रचारक साहित्यिक, कलावंत पाठविले होते. १९४८ ते १९६० असा तब्बल बारा वर्ष संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी जनतेचा संग्राम सुरू होता. या संग्रामात शेतकरी, कष्टकरी, कामगार आघाडीवर होता. आणि त्याचे नेतृत्व अण्णा भाऊ साठे, अमर शेख, द.न. गव्हाणकरांसारखे प्रतिभावंत शाहीर, कलावंत करत होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाही मार्गाने संसदेत आणि विधिमंडळात आपले प्रतिनिधी पाठविल्याशिवाय कामगारांचे राज्य येणार नाही आणि आपल्याला संयुक्त महाराष्ट्रही मिळणार नाही या जाणिवेतून कम्युनिस्ट पक्षाने लोकशाहीतील प्रत्येक निवडणूक लढविली. कम्युनिस्ट पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनसह विविध समविचारी पक्षांशी युती करून अनेक निवडणुका लढविल्या. संयुक्त महाराष्ट्र समिती ही या युतीचे नेतृत्व करीत होती. अण्णाभाऊ- अमर शेखांसारखे कलावंत प्रत्यक्ष जनतेसोबत राहून जनमत तयार करीत होते. अण्णाभाऊंचे लाल बावटा कलापथक संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत होते. आपल्या विचारांच्या कलावंतांची संख्या वाढली पाहिजे यासाठी नवतरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी अण्णाभाऊ, अमर शेख हे धडपडत होते. अशाच एका प्रशिक्षण शिबिरासाठी अण्णा भाऊ साठे हे धसवाडी मध्ये राहिले. तर कम्युनिस्ट पक्षाच्या आदेशावरून शाहीर अमर शेख हे अहमदपूर तालुक्यातील मोहगाव येथे वास्तव्यास होते.

मोहगाव हे अहमदपूर- अंबाजोगाई रस्त्यावरील किनगाव पासून चार किलोमीटर अंतरावर आहे. अहमदपूर पासून पंचवीस - तीस किलोमीटरवर हे गाव आहे. अण्णाभाऊ हे धसवाडी मध्ये राहून कलावंत घडवित होते; तर अमर शेख हे मोहगाव येथे राहून कलावंत घडवित होते. शाहीर अमर शेख यांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिलेल्या कलावंतांपैकी एक म्हणजे सिद्ध ढोलकी पटू बाबुराव गंगाराम मस्के हे होत. त्यांच्या सांगण्यानुसार बाबुरावांचे वय आज ९३ ते ९५ वर्षांच्या दरम्यान आहे. बाबुराव सांगतात " रझाकारीच्या वेळी माझे वय वीस वर्षे होते. पंडित जवाहरलाल नेहरू जेव्हा पंतप्रधान झाले, तेव्हा मी कळत्या वयाचा होतो." बाबुरावांना ढोलकी वाजविण्याचा छंद मुळातच होता. त्यांच्याकडे २० किलो वजनाची सिसम लाकडापासून तयार केलेली सुंदर ढोलकी असून त्यांनी ती आम्हाला प्रत्यक्ष वाजवून दाखविली. तत्कालीन परिस्थितीमुळे बाबुरावांना शाळेत शिक्षण घेता आले नाही. मात्र प्रत्यक्ष समाजात फिरल्यामुळे त्यांना शहाणपण आले. अण्णाभाऊ जिथे तीन महिने राहत होते, ती धसवाडी म्हणजे बाबूरावांची सासुरवाडी. सासुरवाडीला गेल्यावर अण्णाभाऊंसोबतच्या कलावंतांच्या रिहर्सल मध्ये त्यांनी अनेकदा ढोलकी वाजवली असल्याचे ते सांगतात. अण्णाभाऊंची



अनेक गीतं त्यांना आजही मुखपाठ आहेत. तो काळ सामाजिक प्रबोधनाचा काळ होता. बाबुराव जुन्या आठवणीत रमून जातात. वय वाढल्यामुळे त्यांना बऱ्याचदा विस्मरण होते. तरीही मनातल्या मनात जुळवून बऱ्याच गोष्टी ते सांगतात. अमर शेखरणी ढोलकी कशी वाजवावी, शाहिरीत झील कशी ओढावी हे त्यांना शिकविले. अमर शेखांबरोबर गाताना दमछाक व्हायची. कारण अमरशेखांचा आवाज खूपच उंच होता असे बाबुराव सांगतात.

१९६२ साली खानापूरचे कॉ. विठ्ठलराव देशपांडे हे कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार होते. त्यांच्या प्रचारासाठी बाबुराव आणि त्यांच्या कला पथकाने संपूर्ण तालुका पिंजून काढला होता. त्याकाळी लोकसभा आणि विधानसभा या निवडणुका एकाच वेळी होत असत. १९६७ साली बीड लोकसभेसाठी क्रांतिसिंह नाना पाटील हे कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार होते, तर समविचारी शेतकरी कामगार पक्षाकडून अहमदपूर विधानसभेसाठी भाई किशनराव देशमुख हे उमेदवार होते. स्वतःचा प्रचार सोडून भाईंसाठी क्रांतिसिंह नाना पाटील अहमदपूरला आले होते. क्रांतीसिंहांच्या सभेपूर्वी शाहीर पांडुरंग गवळी खानापूरकर आणि त्यांच्या समता कलापथकाने सादर केलेल्या शाहिरीमध्ये बाबुरावांनी ढोलकी वाजवून सर्वांची मने जिंकली होती तो अनुभव त्यांनी सांगितला. नाना पाटलांच्या सभेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. डावे पक्ष विरुद्ध काँग्रेस पक्ष असा दुहेरी सामना त्याकाळी झाला होता आणि त्या निवडणुकीत डाव्या पक्षांनी बाजी मारली होती. डाव्यांच्या विजयामध्ये शाहिरांचा खूप मोठा वाटा होता. आणीबाणी नंतरच्या काळात डाव्या पक्षांची ताकद कमी झाली. शाहीर कलावंतांची ही पक्षाला गरज उरली नाही. त्यामुळे अनेक कलावंतांना पोटापाण्यासाठी लोकनाट्य तमाशा मध्ये जावे लागले. शाहीर बाबुराव मस्के यांनी नंतरच्या काळात हरिभाऊ अन्विकर, रघुवीर खेडकर, उत्तम- रतन लोकनाट्य तमाशा मंडळ अशा अनेक लोकनाट्य तमाशा मंडळांमध्ये ढोलकी पटू म्हणून काम केले. ढोलकी वादना बरोबरच गणगवळण, सवाल जवाब यामध्येही शाहीर बाबुराव मस्के यांनी नावलौकिक मिळविला. ढोलकी वादनाबरोबरच शाहिरांना लाकडी कामाचाही अनुभव आहे. लाकडावर बारीक कलाकुसर करण्यामध्येही त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या घराच्या दरवाज्यावर त्यांनी केलेली कलाकुसर पाहून आम्ही अवाक झालो.

काल लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी आणि डॉ. बालाजी कारामुंगीकर यांच्यासोबत शाहिरांच्या भेटीसाठी खास मोहोगावला गेलो होतो. तिथे त्यांच्या कलापथकातील नंतरच्या काळातील शाहीर आणि नाट्य अभिनेते डॉ. बाबुराव वाघमारे आणि त्यांच्या गायक पत्नी शाहीर कांताबाई वाघमारे यांचीही भेट झाली. त्या तीनही कलावंतांनी दिवसभर आम्हाला डाव्या, पुरोगामी, आंबेडकरी चळवळीतील तसेच लोकनाट्यातील विविध पदे आणि गाणी म्हणून दाखविली. ज्येष्ठ लोककलावंतांच्या सहवासात हा दिवस खऱ्या अर्थाने सार्थकी लागला..!

# बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेमधील स्त्री दर्शन



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या सोज्वळ मोहकतेने बंदर मुंबापुरिचें उजळित येई माघामधलीं प्रभात सुंदर' अगदी मुंबई शहराचे वर्णन करायचे झाले तरी तिला गर्भवती स्त्री ची उपमा देण्याचे धाडस आणि कल्पकता बा सी मर्ढेकरांच्या काव्यातून सरळ समोर येते. आता गर्भवती म्हणजे नाविण्याला जन्म देणारी... आणि मुंबई म्हणजे नावीन्य आणि मोहकतेचा परिपाक म्हणून तिचे वर्णन न्हालेल्या गर्भवती ह्या दोन शब्दात करून स्त्री जाणिवेतून शहराचे वर्णन मर्ढेकर सोडून दुसरे कोणीही त्या ताकदीने करणे शक्य नाही.**

मानवी जगण्याच्या जीवनातील विरोधाभासच्या जाणिवेने निर्माण झालेले काव्य आणि मानवी जीवनातील व वर्तमान परिस्थितीतील अस्वस्थता वास्तव भान व्यक्त करणारी कविता खऱ्या अर्थाने आकारास आली ती मर्ढेकरांच्या काळात, मर्ढेकरांची कविता काव्यविश्वात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे. काव्यातील नवीन संकल्पना आधुनिक प्रतीके आणि प्रतिमांचा साहजिक आणि स्वाभाविक वापर मर्ढेकरांच्या कवितेमध्ये लीलया आढळतो. त्यांच्या कवितेतील नावीन्याच्या अभिव्यक्तीमुळे ते नवकवितेचे प्रवर्तक ठरले. मर्ढेकर म्हणजे नवकाव्याचे जनक असे आजही समीक्षक मानतात. त्यांच्या काव्यापासून कवितेचे नवे युग सुरू झाले म्हणजे नवकाव्याचे जनक बाळ सीताराम मर्ढेकर. मर्ढेकरांचा जन्म खानदेशात फैजपूर येथे १ डिसेंबर १९०९ रोजी झाला. मर्ढेकरांचे लेखन हे युद्धोत्तर काळातील नव्या जाणिवा व नव्या युगाची जाणीव व्यक्त करणारे होते. 'पिपात मेले', 'त्रुटीत जीवन', 'फलाटदादा', 'काळ्या बंबाळ अंधारी', 'गोंधळलेल्या अन् चिचोळ्या', 'न्हालेल्या जणू गर्भवतीच्या' या मर्ढेकरांच्या गाजलेल्या कविता, पोरसवदा होतीस या कवितेमधून त्यांनी आजची मुलगी उद्याची आई असते ह्या जाणीवेतून स्त्रीचे महत्व अधोरेखीत केले आहे.

***पोरसवदा होतीस परवा काल परवा पावेतो,;***
***थांब उद्याचे माऊली, तीर्थ पायांचे घेईतो***

असं शब्दांमधून मातृत्वाचा प्राप्त झालेल्या जननीला देवतेचे स्थान देऊन तिच्या पायात तीर्थ आहे ह्या जाणीवेतून तिला वाकून प्रणाम करण्याची वृत्ती कवीने अंगी बाळगली आहे. जीवनामधील ओंगळपणा बीभत्सता प्रयत्न करूनही टाळता येणे अशक्य मग ते सर्व कवितेमध्ये चाले तर हरकत नाही असा सारासार विचार करून त्यांनी नव्या जाणिवा जीवनातील उणिवा सर्वसामान्य जगण्यातील दुःख सामान्यांचे शब्द यांचा वापर करून स्वतःचे काव्यलेखन समृद्ध केले नव्हे तर मराठी काव्य सृष्टीला नवकाव्याचे वरदान दिले.

नव्या आशयाच्या प्रतिमा, भाषेचा पारंपरिक वापर टाळून तिला अतिशय अर्थसंपन्न करणे ही मर्ढेकरांच्या कवितेतील वैशिष्ट्ये,

***बडवीत टिर्या।अर्धपोट किंवा, ओंगळ***
***देखावा।दाखवीत।। भिक्षा मागे रोज। एवढासा पोर,***
***आई ती लाचार। पाठीमागे।।***

भिक्षा मागणाऱ्या मुलाच्या पाठीमागे फिरणाऱ्या आईची मनःस्थिती दाखवत मर्ढेकरांनी दिसणारे चित्र अधिक भयावह केले आहे. स्वाभिमान टिकला आहे किंवा विकला गेला आहे याचे खरे दर्शन समाजातील स्त्रीच्या स्थानावर अवलंबून आहे. स्त्री समाजव्यवस्थेमध्ये लाचार ठरली की पुढील पिढी भिक्षा मागण्याचे काम करते किंवा तशी वेळ भविष्यातील पिढीवर येते असे सूचक मर्ढेकर यांनी केले आहे.

***आळसली बघ जिवंतता या वृद्धेच्या वदनावर...***

या शब्दांमधून निर्जीवता अधोरेखित करताना जिवंतपणाला आळस आला म्हणजे आता मरणाची वाट सुरु आहे ती भावना तो क्षण तो एका वृद्धच्या चेहऱ्यावर दिसला या ठिकाणीही वृद्ध स्त्री मुळे ती संकल्पना अधिक परिणामकारक होते.

दवात आलीस भल्या पहाटे शुक्राच्या तोऱ्यात एकदा;
जवळून गेलीस पेरीत आपल्या तरल पावला मधली शोभा.

अतिशय तरल आणि भावनाशील कवितेमध्ये सखीचे शोभिवंत वर्णन करताना वरील ओळी मर्ढेकरांनी लिहिल्या आहेत त्यातही

तळहाताच्या नाजुक रेषा कुणी वाचाव्या कुणी पुसाव्या;

या ओळी मधून स्त्री चे भविष्य शेवटपर्यंत अनाकलनीय असते असेच जणू कवीला सुचवायचे आहे की काय असे वाटते. सौंदर्य आणि निर्मळता त्याच्या अनुषंगाने त्यांच्या कवितेमधील स्त्री वेगवेगळ्या पातळीवर वाचकांना आकर्षित करत राहते. अशातच एखादेवेळी घरकाम करणाऱ्या महिलांचे दुःख मांडण्यासाठी त्यांची कविता पुढाकार घेते चार महिन्यांचा गर्भ गळाल्यावर आठ दिवस तरी आराम करावा लागेल तोवर मालकिणीने दुसऱ्या कुणाला कामावर ठेवू नये व आपले काम आपला रोजगार जाऊ नये म्हणून तिला विनंती करायला येणारी मोलकरीण त्यांच्या कवितेतून भेटते, स्त्रीसुलभ खरे म्हणजे एक स्त्रीच समजू शकते या जाणिवेतून या कवितेचा शेवट फार सकारात्मक आहे,

***घास भरविला बाईने तीज, रजा पगारी दिधली वरती;***
***नभातुनी पण सकाळ संध्या मुखास काळे फासूनी फिरती।।***

मर्ढेकरांची कविता जो वाचतो त्याला स्वतःच्या अनुभवविश्वातून वेगळीच अनुभूती देत राहते तसेच काहीसे त्यांच्या महिलाविषयक कविता वाचताना जाणवते. जिथे मारते कांदेवाडी टांग जराशी ठाकुरद्वारा, या कवितेमधून वृद्ध वेश्येची दिनचर्या वाचकांसमोर मांडताना एक वेगळेच दुःख त्यांनी समोर आणले आहे सकाळ दुपार आणि संध्याकाळ वाट बघण्यात गेले तरी उद्याच्या आशेने नव्हे तर जगण्याच्या आशेने अजूनही कुणाची तरी वाट पाहत बसणे एवढेच तिच्या हाती आहे असे विषण्णपणे ही कविता सांगते. भंगू दे काठिन्य माझे ही मराठीमधील एक महत्त्वाची कविता आहे असे मला नेहमीच



वाटते या कवितेतही द्रौपदीचे सत्व माझ्या लाभू दे भाषा-शरीरा या ओळी मधून पाच पांडवांची पत्नी असलेली द्रोपदी आणि त्यातही तिने जपलेले सत्व, याचा उल्लेख स्त्री जातीची उंची व कवितेचा आलेख दोन्हीही एका असीम उंचीवर कवीने नेऊन ठेवले आहेत.

येईल का कधी सीतापति ग, चुकून तरीपण ह्या वाटेला?
घेईल का अन रुजू करून ह्या बोराच्या नैवेद्याला?

रामायणातील शबरी ही संकल्पना वापरून कुठली सीता कुठला राघव? असा भयावह प्रश्न विचारून कवी वाचकाला अंतर्मुख करतात. एकंदरच मर्ढेकरांची कविता मराठी साहित्याला पडलेले भरजरी स्वप्न आहे. त्यातही त्यांच्या कवितेमध्ये स्त्री प्रतिमा गर्भकळेतील सृजनाच्या अविष्करापासून जगण्याच्या आदिम दुःख पर्यंत वाचकाला मोहवित जाते, कधी भयाण वास्तव पाहून अंतर्मुख करते. कधी शब्दात गुरफटून ठेवते तर कधी अतिशय सोप्या आणि साध्या शब्दात व्यक्त होऊन जीवनाची वेगळी परिभाषा करते. मर्ढेकरांच्या कवितेमध्ये स्त्री ही आपल्या आसपास वावरणारी जाणवणारी आणि जगणारी स्त्री आहे त्यामुळेच की सहज वाचकाच्या जवळ जाणारी असते.

***बाळगुनि हा पोटी इवला गोळा, हसशी प्रसन्नतेने;***
साकारून दे निराकृतीला विरुपता तव तन्मयतेने.

अशा साध्या शब्दातून विश्वाच्या नवनिर्मितीचे बीजे स्त्रीच्या अंतरंगी असून तीच जगाची उद्धारती आहे, सृजनशीलतेची नवी संकल्पना स्त्रीच्या अंगी आहे असे सातत्याने मर्ढेकर आपल्या कवितेमधून सांगताना दिसतात. वेगवेगळ्या टीका, प्रसंगी प्रचंड अहंमन्यता आणि अभिमानी म्हणून ओळखले जाणारे मर्ढेकर मराठी काव्य रसिकांसाठी अनेकदा दुर्बोध होत गेले असे असले तरी त्यांच्या कवितेमध्ये स्त्री, तिचे जीवन, स्त्री पात्रे, प्रतीके प्रतिमा आणि रूपके वाचकांना सहज समजतील जाणवतील आणि मोहवतील असेच होते हे त्यांच्या कविता वाचताना जाणवते., (काव्यप्रदेशातील स्त्री लेखक किरण डोंगरदिवे, अथर्व प्रकाशन ह्या ग्रंथातून)

मानवी जगण्याच्या जीवनातील विरोधाभासच्या जाणिवेने निर्माण झालेले काव्य आणि मानवी जीवनातील व वर्तमान परिस्थितीतील अस्वस्थता वास्तव भान व्यक्त करणारी कविता खऱ्या अर्थाने आकारास आली ती मर्ढेकरांच्या काळात, मर्ढेकरांची कविता काव्यविश्वात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे. काव्यातील नवीन संकल्पना आधुनिक प्रतीके आणि प्रतिमांचा साहजिक आणि स्वाभाविक वापर मर्ढेकरांच्या कवितेमध्ये लीलया आढळतो. त्यांच्या कवितेतील नावीन्याच्या अभिव्यक्तीमुळे ते नवकवितेचे प्रवर्तक ठरले. मर्ढेकर म्हणजे नवकाव्याचे जनक असे आजही समीक्षक मानतात. त्यांच्या काव्यापासून कवितेचे नवे युग सुरू झाले म्हणजे नवकाव्याचे जनक बाळ सीताराम मर्ढेकर. मर्ढेकरांचा जन्म खानदेशात फैजपूर येथे १ डिसेंबर १९०९ रोजी झाला. मर्ढेकरांचे लेखन हे युद्धोत्तर काळातील नव्या जाणिवा व नव्या युगाची जाणीव व्यक्त करणारे होते. 'पिपात मेले', 'त्रुटीत जीवन', 'फलाटदादा', 'काळ्या बंबाळ अंधारी', 'गोंधळलेल्या अन् चिचोळ्या', 'न्हालेल्या जणू गर्भवतीच्या' या मर्ढेकरांच्या गाजलेल्या कविता, पोरसवदा होतीस या कवितेमधून त्यांनी आजची मुलगी उद्याची आई असते ह्या जाणीवेतून स्त्रीचे महत्व अधोरेखीत केले आहे

***पोरसवदा होतीस परवा काल परवा पावेतो,***
थांब उद्याचे माऊली, तीर्थ पायांचे घेईतो

असं शब्दांमधून मातृत्वाचा प्राप्त झालेल्या जननीला देवतेचे स्थान देऊन तिच्या पायात तीर्थ आहे ह्या जाणीवेतून तिला वाकून प्रणाम करण्याची वृत्ती कवीने अंगी बाळगली आहे. जीवनामधील ओंगळपणा बीभत्सता प्रयत्न करूनही टाळता येणे अशक्य मग ते सर्व कवितेमध्ये चाले तर हरकत नाही असा सारासार विचार

क्रमशः




# डॉ. नंदकुमार गुरडे यांच्या हस्ते झुंज मधुमेहाशी पुस्तक प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वैद्यकीय क्षेत्राचे अभ्यासक, कवी, चित्रकार, लेखक, सुरेश चौधरी यांच्या झुंज मधुमेहाशी या पुस्तकाच्या प्रकाशन दिनांक २७ नोव्हेंबर २०२२ रविवारी रोजी प्रकाशन समारंभ सिडको एन-४ मधिल कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालयात मोठ्या उत्साहात साजरा झाला. सुरुवातीला आकाशवाणीचे अद् घोषक कै. अनंत काळे यांना एक मिनिट उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. झुंज मधुमेहाशी या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी अध्यक्ष व उद्घाटकन प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नंदकुमार गुरडे यांच्या हस्ते झाले.. मुख्य अतिथी सुप्रसिध्द सुप्रसिद्ध योग तज्ञ डॉ.चारुलता रोजेकर होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिपप्रज्वलन केले गेले. सर्व मान्यवरांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सुरुवातीला झुंज मधुमेहाशी या पुस्तकाचे लेखक सुरेश चौधरी यांनी आपल्या पुस्तकात विषयीचे मनोगत व्यक्त केले.त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध योग तज्ञ डॉ.चारुलता रोजेकर म्हणाल्या रोज १२ ते १५ मिनिटांत १ किलोमीटर वॉक करणे आवश्यक आहे.रोज योगासने करुन डायबिटीस कंट्रोल करता येऊ शकतो.राजगिरा लाडू.. कडधान्ये .. ज्वारीची भाकरी खाऊन आपणं डायबिटीस कंट्रोल करु शकतो. त्यानंतर श्रीराम जोशी, कवयीत्री संध्या परदेसी, संमोहनशास्त्र तज्ञ एस.के.नांदेडकर, भरत कुलकर्णी, सिनेपत्रकार अशोक उजळंबकर , श्रध्दा उद्योग समुहाचे संचालक पी.एम.थोरात, यांनीही भाषणातुन आपले विचार मांडले. उद्घाटक आणि अध्यक्षीय समारोप करताना प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.नंदकुमार गुरडे म्हणाले. मधुमेह हा आजार केवळ औषधोपचार करुन बरा होत नाही.आपला आहार मर्यादित ठेवावा नियमितपणे व्यायाम करणे गरजेचे आहे. जंगफूड टाळा.. आपलीं लाईफस्टाईल बदला म्हणजे आपणं डायबिटीसला दूर पळवून लावू शकू. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीराम जोशी यांनी केले. आभार प्रदर्शन महेश चौधरी यांनी केले. सुधीर कोर्टीकर यांनी सजवलेली फुलांची रांगोळी कार्यक्रमाची शोभा वाढवून गेली. कार्यक्रमसाठी राजश्री बाविस्कर, प्रकाश चौधरी, हर्षवर्धन देशपांडे, गणेश महाजन, सुधीर कोर्टीकर, प्रभाकरराव लऊळकर, यमुनाकांत राळेगावकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सिडको परिसरातील नागरिकांची उपस्थिती कार्यक्रमासाठी होती.

# कलावंताचे मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यासंदर्भात निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** कलावंत आपल्या गीत, पोवाडे, यासरख्या कलेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समाज प्रभोधणाचे कार्य महत्त्वाचे कार्य करत असतात.त्यांच्या गीताच्या माध्यमातून गावोगावी आजही अनेक कलाकार प्रबोधणाचे कार्य करत आहेत.शासणाच्या विविध योजना गावोगावी जावू न गोरगरीबाप्रयंत अतीशय तुटपुंज्या पैशावर हे कलावंत प्रबोधणाचे कार्य करत आहेत.

गेल्या चार ते पाच वर्षापासून या कलावंतावर उपासमारीची वेळ आली आहे.एक वर्ष नोटबंदी तर आता कोरोणासारख्या महामामारिमुळे या कलवंताचे जगणे तुटलेल्या पतंगासरखे झाले आहे.शासणाने पाच हजार मदत देवू केलु पण अद्याप त्यातील एक रूपया सुद्धा त्यांना मिळाला नाही. बिनकदरी या शासणाने त्यांच्या कडे साफ दुरलक्ष केले आहे.जो कलावंत रात दिवस समाजात शाहू, फुले,आंबेडकर यांचा विचाराचा प्रसार करतात.विज्ञाणवादी दृष्टिकोन समाजासमोर ठेवतात.समाजातील वाईट रूढी,परंपरा यावर आपल्या कवणाच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणतात.आज अशाच कलावंताच्या वाट्याला जर मरण येत असेल तर," लहरी राजा,प्रजा आंधळी,अंधातरी दरबार,....अजब तुझे सरकार" अशी म्हणायची वेळ या कलावंतावर आली आहे. यासाठी त्यांच्या मानधण सरकरकट पाच हजार करावे,पात्रतेची मर्यादा पंचेचाळीस वर्ष करावी,उत्पन्न मर्यादा एक लाख करावी,लाभार्थी संख्या दोनशे करावी,म्हाडासह सर्व घरकुल योजनांचा लाभ कलावंताना प्राधाण्याने द्यावा या मागण्यासाठी प्रतीष्टीत कलावंत प्रतीष्टनच्या वातीने जळगाव जामोदतालुक्यातील कलावंतानी तहसीलदारा मारफत राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन दिले. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष प्रकाशभाऊ अवचार . शाहीर अनिल हेलोडे . भगवान अतकारे . मुमताज खान . रमेश नवथळे . महादेव खरात . जिवन शेलार . नाशीर चुडीवाला उत्तम गवई . अजीमखान बाबु . गुलबशहा . पांडुरंग म्हस्के . मुकुंद रोठे . शुभम डब्बेवाले . रसीक मनीहार . देवेश ठाकरे . मोहीनी बावस्कार . नाशीर खान . बाळु मोरे . यासह अनेक कलावंतांच्या सह्या आहेत.






# स.भु. प्रशाला बिडकिन येथे 'एनसीसीडे'

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** स. भु. प्रशाला बिडकिन येथील एन सी सी आर्मी विंग च्या छात्र सैनिकांनी एनसीसीडे साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शालेय परिसर स्वच्छ केला. तसेच असोसिएटेड एन सी सी ऑफिसर डोलारे एम डी यांनी विद्यार्थ्यांना एन सी सी चे महत्व आणि संरक्षण विभागात अधिकारी होण्यासाठी च्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रशालेचे मुख्याध्यापक चितोडकर एम.एल., उपमुख्याध्यापक आर. एस. कोठावदे, जेष्ठ शिक्षक कुलकर्णी पी. पी. यांनी विद्यार्थ्यांना एन सी सी डे च्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. 50 महाराष्ट्र बटालियन चे कमांडिग ऑफिसर कर्नल वाय विजय कुमार यांचे या कार्यक्रमा साठी मार्गदर्शन लाभले.

# निधोना येथे कृषी संजीवनी सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**आडगाव बुद्रुक :** फुलंब्री तालुक्यातील निधोना येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत कृषी संजीवनी सप्ताह कार्यक्रमास तालुक्यात २५ जून पासून सुरुवात करण्यात आली असून ही मोहीम १ जुलै पर्यंत कृषी विभागाकडून संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणार असून निधोना (ता.फुलंब्री) येथे तालुका कृषी अधिकारी फुलंब्री भारत कासार व मंडळ कृषी अधिकारी फुलंब्री निवृत्ती जोरी यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी संजीवनी सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमात कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर फुले यांनी शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यासाठी तंत्रज्ञान, मूल्य साखळी विकास, समूह क्षमता बांधणी, कृषी विभागाच्या विविध योजना, बीज प्रक्रिया, खतांचा संतुलित वापर, सुधारित पीक पद्धती, नवीन तंत्रज्ञान, मशागत तंत्रज्ञान, महाडीबीटी योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा) व इतर कृषी विभागाच्या योजना बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी निधोना गावचे सरपंच सौ. बिजूबाई राऊतराय, उपसरपंच सुभाष राऊतराय, कृषिमित्र कौतिक राऊतराय, कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर फुले, राजेंद्र दांडगे, शुभम जोशी व गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# वैजापूरात विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एम.आय.टी. पॉलिटेक्निक रोटेगाव या संस्थेमध्ये इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांसाठी डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या प्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद देत वैजापूर परिसरातील शाळांमधून 53 विद्यार्थी संघानी सहभाग नोंदविला आणि आपल्या विज्ञान व तंत्रज्ञान विषयातील गुणांना प्रदर्शित केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये अग्रेसर असल्याचे सिद्ध करून दाखविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे प्राचार्य प्रा.किशोर पाटील यांनी संस्थेविषयीची माहिती देताना एकविसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाची आवश्यकता असून या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत, असे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य नारायण कदम, प्राचार्य एस.एम. त्रिभुवन, प्रिन्सिपल स्वाती खैरनार, प्राचार्य बी.एम. हजारे व शिक्षक राजेंद्र आव्हाळे, एम.ए. हिवाळे, विलास पगार, प्रा.पी. डी. भाटकर, बी.ई.व्यवहारे, साळुंखे या मान्यवरांनी मार्गदर्शन करतांना अन्न, वस्त्र, निवारा यासोबतच विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या मानवाच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत, असे सांगितले.

विद्यार्थ्यांनी अशा प्रदर्शनात अवश्य सहभाग नोंदवावा, ज्यामुळे त्यांच्यात संवाद कौशल्य, सादरीकरण व सहकार्याची भावना हे गुण विकसित होतील, असेही सांगितले. या स्पर्थेत जिल्हा परिषद शाळा, लासुरगाव या शाळेतील विद्यार्थी रोहित शेजुळ, राहुल आगवन, विशाल सैलाने, दत्तात्रय शेजुळ या संघाने प्रथम क्रमांकासह रु.10,000/- पारितोषिक मिळविले. साहेबराव पाटील डोणगावकर विद्यालय, काटेपिंपळगाव या शाळेतील विद्यार्थी सुदर्शन धोत्रे, सागर भिंबाळे, ओंकार राऊत, वैभव राऊत या संघाने द्वितीय क्रमांकसह रु. 7,000/- पारितोषिक मिळविले. तर संत तुकाराम विद्यालय, शिंगी या शाळेतील विद्यार्थी गौरव पवार व संदीप पवार या संघाने तृतीय क्रमांकासह रु.5,000/- पारितोषिक मिळविले. न्यू हायस्कूल, वैजापूर (वैभव मतसागर, साई मतसागर, आदित्य मतसागर), न्यू हायस्कूल, दहेगाव (रेणुका मगर, वैष्णवी रावते, आंचल बोराडे, गायत्री दागोडे) आणि जिल्हा परिषद शाळा, मांजरी (शाहेद शेख व गणेश लोहकरे) या शाळांमधील विद्यार्थी संघांनी उत्तेजनार्थ बक्षिसांसह प्रत्येकी रु.2,000/- पारितोषिके मिळविले. याप्रसंगी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शाळांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.विवेक जोशी यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे संयोजक प्रा.योगेश धोत्रे, प्रा.अमोल निकम, प्रा.विवेक जोशी तसेच प्रा.दिगंबर आव्हाळे, प्रा.गणेश भिसे, प्रा.विलास जाधव, प्रा.सूर्यकांत जगताप व संदीप चव्हाण,प्रदीप आव्हाळे,योगेश कलात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लाखोंची रोकड पळवणारा जाळ्यात

## रॉबरीमध्ये चार आरोपी; एक आरोपीस अटक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** 40 फुटी रोड माधव कॉलनी येथील पुरुषोत्तम भाई पटेल हे सायंकाळी वाहनाने घरी जात असतांना ४ अनोळखी इसमांनी पुरुषोत्तम पटेल यांच्या चेहऱ्यावर मिरची पावडर फेकून फिर्यादीस हाताबुक्यांनी मारहाण करुन त्यांच्या स्कुटी वाहनाच्या डिक्कीत ठेवलेले २३,५७,४०० / - रुपये रोख रक्कम व स्कुटी असे जबरीने चोरुन नेले बाबत दिलेल्या फिर्यादवरुन आझादनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदरचा गुन्हा हा जगपालसिंग अजयसिंग भादा व राजपालसिंग अजयसिंग भादा रा. मोहाडी उपनगर धुळे यांनी त्यांच्या अन्य दोन साथीदारासह केला असल्याची व ते जसपालसिंग हरिसिंग जुनी रा. परतुर ता. परतूर, जि . जालना याच्याकडे आश्रयास असल्याबाबत हेमंत पाटील पो.नि. स्थागुशा धुळे यांना माहीती मिळाल्याने दि २७/११/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा धुळे चे पथक परतुर जि . जालना येथे रवाना झाले होते . सदर आरोपीतांचा शोध घेत असतांना जसपालसिंग हरिसिंग जुनी याच्या घरावर पोलीसांनी छापा टाकला असता जयपालसिंग जुनी याने सदर आरोपीतांना तेथून पळवून लावल्याने जसपालसिंग जुनी यास ताब्यात घेवून त्यास चौकशी कामी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा धुळे येथे आणण्यात आले. त्याच्याकडे सखोल चौकशी करता जगपालसिंग अजयसिंग भादा व राजपालसिंग अजयसिंग भादा यांनी त्यांच्या अन्य दोन साथीदारासह वरील रॉबरीचा गुन्हा केल्याचे त्यांनी जसपालसिंग जुनी यास सांगीतल्याचे व गुन्हा केल्यानंतर वरील दोन्ही आरोपींना आश्रय दिल्याचे त्याने कबुल केले आहे . आरोपी जगपालसिंग अजयसिंग भादा व राजपालसिंग अजयसिंग भादा रा मोहाडी उपनगर धुळे यांनी त्यांच्या अन्य दोन साथीदारांसह सदर गुन्हा केल्याचे व गुन्हा केल्यानंतर जसपालसिंग हरिसिंग जुनी वय २ ९




रा . परतुर ता . परतुर जि . जालना याने त्यांना त्याच्या घरात आश्रय दिल्याचे निष्पन्न झाले असुन जसपालसिंग हरिसिंग जुनी यास पुढील कारवाई करीता आझादनगर पोलीस स्टेशन जि. धुळे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. इतर आरोपीतांचा शोध सुरु आहे. सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक सो धुळे , किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. हेमंत पाटील यांचे स्थानिक गुन्हे शाखा पथकातील योगेश राऊत, प्रकाश पाटील, असई संजय पाटील, दिलीप खोंडे, श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, अशोक पाटील, कुणाल पानपाटील, योगेश चव्हाण, राहुल सानप, उमेश पवार, पंकज खैरमोडे, रविकिरण राठोड पोकॉ कमलेश सुर्यवंशी, राहुल गिरी, मयुर पाटील, किशोर पाटील, सुनिल पाटील, अमोल जाधव सागर शिर्के , तुषार पारधी अशांनी केली आहे.

## भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षापदी सुवर्णा पवार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पश्चिम महाराष्ट्रातील आघाडीच्या



लेखिका व कवयित्री सुवर्णा पवार यांची साहित्य कला, सामाजिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील कामाची आवड पाहून आणि साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध समस्या सोडवण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या योगदानाबद्दल भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रिडम स्टोरी या संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षापदी नियुक्ती करण्यात आली आहे, आपल्या कुशल नेतृत्वाने शुभ कार्याचा जागर जिल्ह्यात असाच तेवत राहावा, अशी आशा करून आपण ही जबाबदारी घेऊन या साहित्य व सांस्कृतिक योगदानास सहकार्य करून कार्याचा शुभारंभ करावा असे संघटनेचे अध्यक्ष विशाल सिरसट यांनी सांगीतले व पुढील साहित्य व सांस्कृतिक वाटचालीस मनःपर्वक शुभेच्छा दिल्या.

# नांदेड सिटीत 26 नोव्हेंबर रोजी संविधानदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** सिटीतील विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन हा दिन साजरा केला यात रामराजे जेष्ठ नागरिक संघ, नांदेड सिटी रेसिटेंड डॉक्टर असोसिएशन, नांदेड सिटी ब्रह्माकुमारी सेंटर, स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान, परिवर्तन ग्रुप, नांदेड सिटी सोशल व कलचरल फौंडेशन ग्रुप, आसावरी आनंदी कट्टा यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मुंबईतील जेष्ठ निवृत्त न्यायधिश अ‍ॅड. माधवराव कुलकर्णी उपस्थित होते. तर पुण्यातील ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. सदानंद फडके प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते. सुरवातीस मान्यवरांनी दीपप्रज्वलन करत भारतमाता प्रतिमा, सविंधान प्रत व भारतरत्न घटनाकार बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. गिताताई शिंदे यांनी सविंधान दिन व संविधान पुजन याचे महत्व विदीत करत प्रास्ताविक केले. माधवराव कुलकर्णी यांनी संविधान निर्मिती, पार्श्वभूमी आणि निर्मिती प्रक्रिया तसेच रचना व सविंधानात समाविष्ट असलेल्या विविध कलमांची सखोल माहिती दिली.
अ‍ॅड. नंदु फडके यांनी संविधान म्हणजे काय त्याचे पालन आपल्या छोट्या छोट्या व्यवहारांत आपण कसे आचरणात आणले पाहिजे असे अनेक उदाहरण सांगून आपल्या भाषण शैलीत विविध उदाहरणे देत जनतेच्या मुलभूत हक्का सोबत संविधान पालनाच्या आपल्या जबाबदारीची जाणीव उपस्थितांना करुन दिली. माणूस म्हणून आपण जगत होतोच पण भारतीय संविधानाने आपल्याला माणूस म्हणून सन्मानाने जगायला शिकवले असे प्रतिपादन केले. छोट्या प्रसंगातही नियमांचे पालन करणे ही आपली जबाबदारी आहे व त्याचे काटेकोर पालन करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करत पुढील पिढीसाठी आपण काय आदर्श ठेवत आहोत याचेही अवलोकन करावे अशी सुचना केली. आपली संस्कृती परंपरा व सनातन धर्म आपणांस सुसंस्कृत वागण्याचे मार्गदर्शन करत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. व्यासपीठावर नांदेड सिटी संचालक अ‍ॅड. नरसिंहजी लगड, प्रजापिता ब्रम्हाकुमारी नांदेड सिटी केंद्रप्रमुख ललिता दिदी, रामराजे ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रमोद कुलकर्णी, स्वांनद जनकल्याणचे सुधीरजी काळकरे उपस्थित होते.

## कुमारी प्रीती कापसे हिची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**वाळूज :** तिसगाव येथे 28 नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय



कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर माध्यमिक व उच्च मा. विद्यालय रांजणगाव पोळ विद्यालयाची विद्यार्थिनी प्रिती रामेश्वर कापसे ने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत वयोगट -17 व वजनगट -43 मध्ये जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे प्रीती कापसेची विभागीय पातळीवर होणाऱ्या कुस्ती क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती गुरु व वडील पैलवान रामेश्वर कापसे यांच्या तालमीत तयार होत असून, क्रीडा शिक्षक शिवाजी महाजन यांचे तिला मार्गदर्शन लाभले आहे.या निवडीमुळे संस्थेचे अध्यक्ष इंदुमतीताई डोणगावकर, सचिव देवयानीताई डोणगावकर, मार्गदर्शक कृष्णा पाटील डोणगावकर, शालेय समिती अध्यक्ष शिवाजी पा.बोडखे, मुख्याध्यापक सुधाकर थोरात, क्रिडाशिक्षक शिवाजी महाजन, अधिकारी संतोष मल्लनाथ, विलास जाधव, अनिल कुमावत, रामेश्वर शेळके, डी.पी. चिमणकर, सी.एच. गायकवाड, ए.एन. शेख, आर. एच. शिरसाट, के.बी. मोरे, तुकाराम शेलार, प्रतिभा नितनवरे, आनंद बोडखे, करवारे मामा, ए. एस.बीरोटे, बि.जे.पांडव यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी प्रीती व तिच्या वडिलांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## सीमा देशमुख यांना सर्वद फाउंडेशनचा उत्कृष्ट लेखनाचा पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आधुनिक केसरी परिवारातील लेखिका



सौ. सीमा देशमुख (अमरावती) यांना सर्वद फाउंडेशन मुंबईचा उत्कृष्ट लेखनाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. साहित्य क्षेत्रातील 275 लेखक, कवी, यांचे लिखाण पुरस्कारासाठी मागविण्यात आले होते. त्यापैकी 35 जणांची निवड झाली असल्याचे संयोजकांकडून कळविण्यात आले आहे. सीमा देशमुख यांचे ललित, प्रासंगिक आणि काव्य विषयक लेखन सातत्यपूर्ण सामाजिक जाणिवेचे राहिलेले आहे. दैनिक आधुनिक केसरीत देखील त्यांचे वैविध्यपूर्ण लेखन प्रसिध्द होत असते. या पुरस्कार निवडीबद्दल सीमा देशमुख यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## बलात्काराचा गुन्हा दाखल होताच आरपीआय शहराध्यक्षाची हकालपट्टी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नवऱ्याला सोडण्यास भाग पाडंत विवाहितेचे १ वर्षांपासून शोषण करणाऱ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या शहराध्यक्षाला मुकुंदवाडी पोलिसांनी आज पहाटे २वा. बेड्या ठोकल्या. तर शहर जिल्हाध्यक्ष नागराज गायकवाड यांनी त्याची हकालपट्टी केली.जयकिशन कांबळे रा.राजनगर असे अटक आरोपीचे नाव आहे.

## नंदू धुरंधर दिग्दर्शित ३ लघुपट गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव "एन एफ डी सी फिल्म बाजार" मध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि एन एफ डी सी फिल्म बाजार २०२२ मध्ये मराठी लघुपट चित्रपट या विभागात यावर्षी मार्केट स्क्रीनिंग आणि विव्हिंग रूम करता गामा फाऊंडेशन फिल्म्स ने पहिल्यांदयाच स्वतःची निर्मिती आणि छाया प्रॉडक्शन ची सहनिर्मिती असलेल्या एकूण ०४ मराठी लघुपट चे सबमिशन केले होते. एन.एफ.डी.सी फिल्म बाजार हे एक प्रकारचे संपूर्ण चित्रपटसृष्टी करता लागणारी आर्थिक सहाय्य व्यवस्था आणि सहनिर्मिती त्याच बरोबर फिल्म्स रिलीझ व डिस्ट्रिब्युशन यांचा दुवा जोडणारे व्यासपीठ आहे. गामा फाऊंडेशन फिल्म्स निर्मित आणि छाया प्रॉडक्शन सहनिर्मित एकूण ४ लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले.
[ (फ्रेंच फ्राईस (हॉरर) /पँडेमिक द ब्राइट साइड( फॅमिली ड्रामा)/स्पेशल पेन्टिंग (हॉरर) /लुडो क्वीन (हॉरर) ] लघुपटांचे दिग्दर्शन अनुक्रमे अमृता देवधर आणि नंदू धुरंधर यांनी केले आहे.आणि कथा अमृता देवधर आणि कल्पना राणे यांची आहे.




या गोव्यातील महोत्सवाला दिग्दर्शक अमृता देवधर आणि नंदू धुरंधर आणि छाया प्रॉडक्शन चे संदीप कामत सर उपस्थित होते.
भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (IFFI), आशियातील सर्वात जुना व भारतातील सर्वात मोठा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव असून दरवर्षी या महोत्सवात चित्रपट सृष्टीतील दर्जेदार चित्रपटांची निवड होते, आणि भारतातील व जगातील सर्वोत्कृष्ट चित्रपट प्रदर्शित केले जातात.



# विविध योजनेअंतर्गत नादरपूर ग्रा.पं. करणार गावाचा विकास

## सरपंच सविता निकम : गटविकास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एक लाख तीन हजारांचा कर वसूल

आधुनिक केसरी न्यूज

**नादरपूर :** गाव असो की शहर जिथे बगा तिथे विकास कामाची बोम्ब, कन्नड तालुक्यात अनेक ग्रा. पं. चे निवडनुक सत्र सूरु असल्याचे पहावयास मिळत आहे, अनेक हौसे-नौसे आजी माजी,कार्यकरते आता पासूनच कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे, अनेक सरपंच उपसरपंच आपल्या कार्यकालात काय दिवे लावले आहे, हे अनेक माध्यमातून दाखवत आहे, मात्र एक गोष्ट तर खरी आहे, विकास काम जर होत असतिल तर ते दिसुनचं येतात, विकास कामे हे काही छोटीशी वस्तु नाही की लपवता येईल म्हणून, याचाच एक भाग आज आपन दैनिक आधुनिक केसरी च्या माध्यमातून बघनार आहोत. कन्नड तालुक्यातिल नादरपुर येथिल ग्रामपंचायत ने सत्ता आल्या पासून गावाचा हुलिया बदलून टाकल्याचे चित्र पहावयास मिळत आहे, या गावाचि लोकसंख्या सन 2011 जनगणनेनुसार 1976 व आताची लोकसंख्या 2475 अंदाजे आहेत, लोकसंख्याची घनता बगता गांव खुप 'छोटे' आहे मात्र विकास कार्य 'मोठे' असल्याचे दिसत आहे या ग्रा पं कार्यलयात सरपंच म्हणून श्रीमती सविता निकम, व उपसरपंच म्हणून युव पीढ़ीतिल सागर निकम हे काम बघतात त्यांच सोबत शाश्कीय विभगाचे ग्रामविकाधिकारी श्री बनकर हे या गावाचे काम बघतात. डिजिटल युगा मध्ये ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी जि.प.शाळेत एसी रूम तयार करून संगणक कक्ष सुरू करण्यात आला आहे व पाणी फिल्टर देखील बसवण्यात आले आहे . ग्रामीण भागात पूर्वीपासून गावाला एक मुख्य प्रवेशद्वार असायचे त्यास बेस म्हटले जाते . येथे १८२८ मध्ये बांधलेल्या बेसीचे पुनरुज्जीवन करून गावाचा ऐतिहासिक वारसा जपण्याचे काम केले आहे जनु काहि याच वर्षी वेस उभारल्यासारखे चित्र पहावयास मिळत आहे,या वेसीचे काम करून येथील ग्रामपंचायतीने आगळ्यावेगळा उपक्रम अंमलात आणला आहे, तसेच महेनतीच्या जोरावर तसेच विद्यार्थिमध्ये असलेला स्पर्धा परिक्षेचा धाक, दूर करून त्यांना उच्चशिक्षनासाठी प्रोत्साहित करण्यात करिता गावातील तरुण मुलगा एमपीएससी अंतर्गत नोकरीला लागल्या ने त्यास प्रोत्साहन अकरा हजार रुपये देण्याचा व सत्कार करण्या चा ठराव ग्रामपंचायतीने घेतला होता. यासाठी येथील अभ्यासु व मेहनती जगदीश भीमराव निकम हा पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने अकरा हजार रुपये प्रोत्साहनचा तो गावतील पहिला मानकरी ठरला आहे . गावात शासन स्तरावरील विविध योजना प्रभावीपणे राबवून गावाला विकासाच्या प्रवाहात आणत राज्याच्या विकासाच्या नकाशावर गावाचे नाव आणण्यासाठी नादरपूर गाव एकवटले असून , त्यासाठी येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थ जीवतोड मेहनत करीत आहे . जैसे आपण स्नान करावे ।






तैसे गांवही स्वच्छ ठेवीत जाये । सर्वंचि लोकांनी शिजून घ्याये । श्रेय गावाच्या उन्नतीचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गावाच्या प्रगतीचे ग्रामगितेतून चपखल वर्णन केले आहे . आज गाव असो की शहर, सर्वत्र टोकाच्या राजकीय भूमिकांमुळे प्रगती ठप्प झाल्यासारखे वाटते ; परंतु दांडगी इच्छाशक्ती असेल तर राजकीय विरोध देखील निष्प्रभ होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे कन्नड तालुक्यातील नादरपूर हे गाव . ग्रामस्थांनी एकत्र येऊन विकास साधताना काळाची पावले ओळखून शिक्षण व तंत्रज्ञान या बाबींवर अधिक भर दिला आहे .

गावातील नागरिकांना स्वच्छ पाणी मिळावे याकरिता जलशुद्धीकरण केंद्र सुरू करण्यात आले. त्याच बरोबर विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या संकल्पनेतून ' थोडेसे मायबापासाठी पण या अभियानांतर्गत गावातील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग्यांसाठी येथे पहून असलेल्या मंगल कार्यालय इमारतीचे शोभीकरण करून तेथे सुसज कक्ष सुरू करण्यात आला . करमणुकीसाठी येथे एलईडी टीव्ही , आरामदायी खुर्च्या व वाचण्यासाठी पुस्तके तसेच भिंतीवर संतांची फोटो व सुविचार लिहून भिंती बोलक्या केल्या आहेत . गाव विकासाबरोबरच उत्कृष्ट संगणक गावातील गरीब व होतकरू मुलांना अभ्यास करता यासाठी डॉ . बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका सुरू करण्यात आली असून , सध्या २५ विद्यार्थी येथे दररोज अभ्यासासाठी येतात . गावाचा सर्वांगीण विकास उत्कृष्ट शिक्षणा बरोबरच सांस्कृतिक ठेवा जपण्यासाठी येथे श्रीकृष्ण संगीत प्रशिक्षण मोफत केंद्र देखील सुरू करण्यात आले असून , अनेक जण इथे संगीत शिकण्यासाठी येताहेत , देखरेखसाठी ग्रामस्तरावर विविध समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून , विकास कामात अडथळा आणणाऱ्या व्यक्तीस शासकीय योजनांचा लाभ न देण्याचा मुख्य निर्णय येथील ग्रामपंचायतने घेतलेला आहे . सध्या स्वच्छ भारत मिशन व पंधराव्या वित्त आयोगातून दोन मजली सार्वजनिक शौचालय इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर पूर्ण झाले असून गटविकास अधिकारी यांच्या हस्ते उटघाटन ही केले आहे. गावातील पैसा गावातच राहावा यासाठी माफक दरात रोपे उपलब्ध व्हावी यासाठी सरपंच सविता निकम यांनी स्वतः श्रीकृष्ण रोपवाटिका सुरू केली आहे. त्यामध्ये राजमुंद्री ( आंध्र प्रदेश ) येथून रोपे आणून तसेच नवसारी ( गुजरात ) जिल्ह्यातील केशर आंबा येथे आणून माफक दरात उपलब्ध करून दिला आहे . शिवार फेरी, सेंद्रिय शेती कार्यशाळा असे विविध उपक्रम प्रत्येक महिन्याला आयोजित करून कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते . वैयक्तिक स्वार्थापलीकडे जाऊन विकासाची कास धरली तर गावाची भरभराट होण्यास वेळ लागत नाही हे नादरपूरवासीयांनी दाखवून दिले . ग्रामस्थांचे संपूर्ण सहकार्य मिळून ग्रामपंचायतने या विकास कामांची भरारी घेतली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.




## संभाजी ब्रिगेड प्रदेश महासचिव सौरभ खेडेकरांची नांदुरा येथे महत्त्वपूर्ण बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव शिवश्री सौरभ खेडेकर हे जळगाव जामोद, नांदुरा, मोताळा जनसंवाद दौऱ्यावर असताना नांदुरा येथे दिनांक २७ नोव्हेंबर २०२२ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा येथे भेट देऊन नाशिक येथे होऊ घातलेला संभाजी ब्रिगेडचा वर्धापन दिवस याबद्दल महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. आजपर्यंत केलेल्या कामांचा आढावा घेऊन आगामी निवडणुकांना कसे सामोरे जावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच संभाजी ब्रिगेडच्या सदस्य नोंदणीचा शुभारंभ करत संभाजी ब्रिगेडचे विनोद वनारे यांच्यापासून सुरुवात केली. या बैठकीला संभाजी ब्रिगेड बुलढाणा जिल्हाध्यक्ष शिवश्री योगेशदादा पाटील यांनी निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन कामाला लागा असे सांगत सदस्य नोंदणी करण्याचे आदेश दिले.यावेळी संभाजी ब्रिगेड नांदुरा तालुकाध्यक्ष अमर रमेश पाटील यांनी आज पर्यंत १० वर्षांत केलेल्या कार्याचा आढावा सादर केला.यामधे शेतकऱ्यांसाठी केलेलं अनेकानेक आंदोलनं,ज्वलंत सामाजिक मुद्दे हाती घेऊन कसे मार्गी लावले. यावेळी संजू पाटील,संभाजी ब्रिगेड जिल्हा कार्याध्यक्ष मंगेश सोळंके, तालुका उपाध्यक्ष दिलीप कोल्हे, तालुका उपाध्यक्ष अमोल पाटील, तालुका संपर्कप्रमुख सचिन गणगे, तालुका प्रसिद्धीप्रमुख प्रदीप कुटे, तालुका कार्याध्यक्ष संतोष सोळंके, नांदुरा शहराध्यक्ष हिमांशू अवचार, शहर उपाध्यक्ष कुलदीप डंबेलकर, संतोष गायगोळ, भोटा शाखाध्यक्ष विनायक पारस्कार, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष पवन सोळंके, अमोल क्षीरसागर, संतोष देशमुख,अभिषेक सोळंके, पत्रकार पवन चव्हाण व इतर उपस्थित होते.

## अतिक्रमणधारकांना देण्यात आलेल्या नोटीसच्या विरोधात निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** सर्वोच्च न्यायालयाने सन २०११ जगपाल सिंग विरुद्ध पंजाब सरकार या खटल्यात गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याचा आदेश पारीत केला होता. त्या अनुशंगाने तत्कालीन सरकारने १२ जुलै २०११ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमिवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने उच्च न्यायालयाने SUO MOTO PUBLIC INTREST LITIGATION NO. 2 OF 2022 नुसार राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करुन जमिनी ताब्यात घेण्याचे आदेश दिले आहे. या आदेशानुसार शासन स्तरावरुन प्रशासनाला गायरान जमिनीवरील अतिक्रमणे काढण्याचे आदेश प्राप्त झाले असुन उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशावरून जळगाव जामोद नगर पालिका च्या वतीने 25 तारखेला अतिक्रमण धारकांना नोटीसे देण्यात आली आहेत. या कार्यवाहीच्या विरोधात आज माजी न.पा उपाध्यक्ष संजय पारवे व सामाजिक कार्यकर्ते डॉ शाकीर खान यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण धारकांनी उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी नगर परिषद यांच्या कडे आपले जबाब नोंदवून, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गायरान अतिक्रमण धारकांच्या ताब्यातील जमिनी निष्कासन करण्याच्या आदेशास सरकारने न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी व निष्कासनाच्या कारवाईस तात्काळ स्थगिती द्यावी आणि जळगाव जामोद शहरात गायरान जमीन नसल्याने हे प्रोसेस तात्काळ थांबविण्यात यावे. या दोन प्रमुख मागण्याबाबत निवेदन देण्यात आल्या.

## सोयगाव तालुक्यातील गावांत कृषि विभागामार्फत पोषण आहार भाजीपाला किटचे वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागामार्फत पोषण आहार भाजीपाला किटचे वाटप तालुका कृषि अधिकारी सोयगांव एस.जी.वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मा योजनेअंतर्गत तालुक्यातील विविध गावात पोषणआहार भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे.सदरील योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पोषणमूल्याअभावी होणारे कुपोषण कमी करणे, पोषणयुक्त - संतुलित व सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे या प्रकारची उद्दिष्टे साध्य केली जात आहेत. सदरील योजनेअंतर्गत तालुक्यातील 833 कुपोषित बालके असलेल्या कुटुंबांची निवड गावातील अंगणवाडी सेविका यांचे मार्फत करण्यात येत असून प्रथम टप्प्यात सोयगांव तालुकयास 333 भाजीपाला किटचे वाटप करण्यात आले आहे तसेच द्वितीय टप्प्यात 500 भाजीपाला किट वाटप करण्यात येत आहे.त्यानुसार तालुक्यात दि.27-11-2022 रोजी मौजे – वरखेडी बु. येथील कुपोषित बलकांच्या कुटुंबीयांना भाजीपाला किट माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव, बबलू शेठ, सरपंच व उपसरपंच यांचे हस्ते कृषि पर्यवेक्षक हेमंत देशमुख, बी.टी.एम. ए.एस.महाजन व कृ.स.एस.एस.चव्हाण यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)



नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in